




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०११ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# ‘लाडकी बहीण’ योजनेत मोठा घोटाळा

## अडीच कोटी केवायसीनंतर समोर आला धक्कादायक प्रकार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘लाडकी बहीण’ योजनेबाबत पुन्हा एक मोठी माहिती समोर आली असून, तब्बल अडीच कोटी केवायसी पूर्ण झाल्यानंतर या योजनेचा गंभीर गैरवापर झाल्याचं स्पष्ट झालं आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजूंना आर्थिक मदत देण्यासाठी सुरू केलेल्या या योजनेचा सरकारी महिला कर्मचाऱ्यांनीच मोठ्या प्रमाणावर लाभ घेतल्याचं प्रशासनाच्या तपासात उघडकीस आलं आहे.




गरीब, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, बेरोजगार आणि आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या महिलांना महिन्याला मदत मिळावी. पण त्याऐवजी नियमित वेतन मिळवणाऱ्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील अर्ज करून लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला.

राज्य सरकारने केवायसी प्रक्रियेची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर वाढवल्यानंतर, अडीच कोटींहून अधिक केवायसी तपासले गेले. या तपासणीदरम्यान लाभार्थ्यांची माहिती विभागानुसार, वेतनानुसार आणि शासकीय सेवेत असलेल्या पदांनुसार क्रॉस-तपासणी करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणावर असे दिसून आले की: अनेक सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी अर्ज केला अर्ज स्वीकारला गेला आणि त्यांना आर्थिक लाभही मिळाला काही प्रकरणांत कर्मचाऱ्यांनी मुद्दाम माहिती लपवून किंवा खोटी माहिती देऊन लाभ घेतला तपासात गैरवापर झाल्याचं स्पष्ट होताच आता संबंधित प्रत्येक कर्मचाऱ्याची स्वतंत्र चौकशी करण्यात येणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत ज्यांनी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला आहे, त्यांच्याकडून मिळालेला सर्व पैसा परत वसूल करण्याची प्रक्रिया विभागीय पातळीवर सुरू करण्यात आली आहे आणि यासाठी लवकरच नोटिस देण्यात येणार आहेत. चौकशीत दोष सिद्ध झाल्यास त्या कर्मचाऱ्यांची पुढील वेतनवाढही थांबवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, शिस्तभंगाच्या कारवाईसाठी इतर सेवा नियमांनुसार पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.

## डिसेंबरअखेर सुरू होणार मेट्रो-९



मुंबई : डिसेंबरअखेर दहिसर ते काशिमिरा मार्गावर मेट्रो सुरू होणार आहे.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दहिसर ते काशिमिरा या मेट्रो मार्गाची गुरुवारी पाहणी केली तेव्हा त्यांच्यासोबत ‘महामेट्रो’चे अधीक्षक अभियंता व त्यांची तंत्रज्ञ सल्लागार कंत्राटदार टीम उपस्थित होती.




## रांजणगावमधील प्रदूषणाबाबत १५ दिवसांत बैठक

**रत्नागिरी : (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील रांजणगाव एमआयडीसीतील प्रकल्पामुळे प्रदूषणाच्या त्रासामुळे ग्रामस्थ आंदोलन करत असून, यासंदर्भात पर्यावरण मंत्री पंकजा मुंढे यांच्या उपस्थितीत येत्या पंधरा दिवसांत बैठकीचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. येथील नागरकांनी गैरसमज करून घेऊ नये, नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी राज्य शासन योग्य ती कार्यवाही करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.



■ उदय सामंत; नागरिकांचे आरोग्य, समस्यांकडे शासनाचे लक्ष

रत्नागिरीत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. रांजणगाव एमआयडीसीतील काही प्रकल्पांमुळे नदीचे पाणी दूषित झाले आहे.

## प्रचारात सक्रिय होणार; युतीचा धर्म पाळणार : वैभव खेडेकर

**खेड : (समर्थ गांवकरी)**

खेड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत युती मध्ये सर्वकाही ठीक नाही असे म्हटले जात असतानाच रोजी चमत्कारिकरित्या मनोमिलन दिसून आले. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर भाजपचे रत्नागिरी उत्तर जिल्हा निवडणूक संयोजक वैभव खेडेकर युतीच्या चर्चेपासून दूर राहिले होते. त्यांनी आज शिवसेना नेते रामदास कदम व गृहराज्य मंत्री योगेश कदम यांची भेट घेतली व युती धर्म पाळणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे युती विरुद्ध आघाडी लढत रंगणार, असे थेट चित्र निर्माण झाले आहे.



महाराष्ट्रातील महायुतीचा पहिलाच नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज देखील खेड नगर परिषदेसाठी ना. योगेश कदम यांच्या उपस्थितीत दाखल झाला होता. अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांची उपस्थिती होती; मात्र भाजपत दाखल झालेले शहराच्या राजकारणात प्रभाव असलेले भाजपचे रत्नागिरी उत्तर जिल्हा निवडणूक संयोजक वैभव खेडेकर हे या प्रक्रियेदरम्यान गैरहजर असल्याने शहरात विविध चर्चांना उधाण आले होते. त्यातच त्यांच्या पत्नी वैभवी खेडेकर यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

याच पार्श्वभूमीवर 20 रोजी वैभव खेडेकर यांनी आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह युतीच्या संपर्क कार्यालयात उपस्थित राहून शिवसेना नेते रामदास कदम आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची भेट घेतली.

या भेटीनंतर खेडमध्ये होणारी निवडणूक शिवसेना व भाजप तर्फे युतीने लढवण्यात येणार असल्याचे स्पष्टपणे दिसून लागले आहे. शहरात काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना या भेटीने पूर्णविराम मिळाल्याचे बोलले जात आहे.

## ताम्हिणी घाट अपघात, दरीत कोसळलेल्या 'थार'मधील सर्व पुण्याचे

### १९ ते २२ वर्षाचे पर्यटक युवक ठार, कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी घाट हा महत्वाचा दुवा समजला जातो. मात्र, या घाटात वारंवार अपघात होण्याची घटना समोर येत आहेत. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कोंडवे धावडे गावातील 6 तरुण आपली नवीन थार घेऊन कोकणात फिरण्यासाठी निघाले होते. मात्र मंगळवारी पहाटे या तरुणांची थार कार घाटातील एका 500 फूट खोल दरीत कोसळल्याची घटना घडली होती. यामधील 4 जणांचे मृतदेह शोधण्यात रेस्क्यू टीमला यश आलं आहे. उर्वरित दोघांचा शोध अजूनही सुरु आहे.

20 दिवसांपूर्वी फिरायला गेलेल्या या तरुणांपैकी एकाने नवी कोरी थार कार घेतली होती. मात्र आवडीने तो आपली कार घेऊन आपल्या मित्रांसमवेत कोकणात फिरायला निघाला होता. मात्र, वाहनावरील नियंत्रण सुटून हा अपघात घडला



आहे. सध्या 4 जणांचे मृतदेह रेस्क्यू करणाऱ्या टीमच्या हाती लागलेत उर्वरित दोघांचा शोध अजूनही सुरु आहे.

अपघातातील तरुणांची नावे

१) साहिल गोठे (वय 24)
२) शिवा माने (वय 20)
३) प्रथम चव्हाण (वय 23)
४) श्री कोळी (वय 19)
५) ओमकार कोळी (वय 20)
६) पुनीत शेट्टी (वय 21)

सर्व राहणार पुणे जिह्यातील कोंडवे कोपरे गावातील आहेत.

थार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट दरीत कोसळली. या कारमधून एकूण 6 प्रवाशी प्रवास करत होते. परवा मंगळवारी रात्री हा अपघात झाला होता. मात्र, बेपत्ता व्यक्तींच्या नातेवाईकांनी चौकशी केली असता त्यांचे लोकेशन रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या ताम्हिणी घाटात सापडल्याने आज या घटनास्थळी शोध सुरू करण्यात आला. शोधमोहीमेत आतापर्यंत चौघांचे मृतदेह आढळून आले आहेत. मात्र, उर्वरित 2 जण अजूनही बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा करण्यात आला. तसेच, अपघाताचे नेमकं कारण अजून स्पष्ट झालेलं नाही. मात्र प्रथमदर्शनी चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यानेच गाडी दरीत कोसळली असावी.

ड्रोनद्वारे परिसराची तपासणी सुरू असून चार मृतदेह आढळून आले आहेत. ते वर आणण्याचे काम सुरू आहे. बचाव पथक दोरखंड, क्रेन आणि इतर उपकरणांच्या मदतीने हे रेस्क्यू ऑपरेशन करत आहे. वाहनात आणखी प्रवासी होते का, याचा तपासही सुरू असल्याची माहिती माणगावचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी दिली. दरम्यान, मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.



## १३ जागांवर थेट, २१ जागांवर तिरंगी लढत

**बदलापूर : (समर्थ गांवकरी)**

कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असताना त्याापूर्वीच बदलापुरातील २४ प्रभागातील लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. बदलापुरात महायुतीतील शिवसेना (शिंदे) विरूद्ध भाजप आणि अजितदादांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अशी थेट लढत होणार आहे. ४९ जागांपैकी १३ जागांवर शिवेसना (शिंदे) विरूद्ध भाजप अशी लढत होईल. तर २१ जागांवर तिरंगी लढत पाहायला मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १६३ अर्ज वैध ठरले असून नगराध्यक्ष पदासाठी ५ उमेदवार रिंगणार आहेत.

## तुळजाभवानी मातेचा शाकंभरी नवरात्रौत्सव २० डिसेंबरपासून



**तुळजापूर : (समर्थ गांवकरी)**

तुळजाभवानी देवीचा शाकंभरी नवरात्र महोत्सव यंदा २० डिसेंबर ते ४ जा-नेवारीदरम्यान पार पडणार असून या अनुषंगाने मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत सर्व तयारी अंतिम करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस तहसीलदार माया माने, महंत तुकोजी बुवा, महंत चिलोजी बुवा, पुजारी मंडळाध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, आरोग्य विभागाचे अविनाश ढगे, सहायक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी पूजाविधींच्या उपस्थित होते. बैठकीत महोत्सवात होणाऱ्या प्रमुख धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था, भक्त व्यवस्थापन, आयोजनासह स्वच्छता व वाहतूक व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा झाली. महोत्सवाचा प्रारंभ २० ते २८ डिसेंबरदरम्यान सुरू राहणाऱ्या मंचकी निद्रा विधीने होणार आहे. २८ डिसेंबर रोजी पहाटे देवींची सिंहासनावर प्रतिष्ठापना होणार असून दुपारी १२ वाजता घटस्थापना केली जाणार आहे. २९ डिसेंबरला रथ अलंकार महापूजा, ३० डिसेंबरला मुरली अलंकार महापूजा तर ३१ डिसेंबर रोजी जलयात्रा आणि शेषशाही अलंकार महापूजा पार पडेल.

## धनंजय मुंडेंना वाचविण्याची किंमत मोजावी लागेल

### मनोज जरांगे यांचा अंगरक्षक सोबत घेण्यास नकार



**वडीगोद्री : (समर्थ गांवकरी)**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी पोलिस अधीक्षकांना सुरक्षा काढून घेण्याचे निवेदन दिल्यानंतर गुरुवारी (दि. २०) त्यांनी पोलिस अंगरक्षकास गाडीत बसण्यास नकार दिला. यावेळी जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धनंजय मुंडेंना वाचविण्याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला.

अंतरवाली येथे गुरुवारी माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, तुम्ही धनंजय मुंडेंना चौकशीसाठी बोलावत नाही. तुम्ही धनंजय मुंडेंना वाचविण्याचे काम करत आहात. जर का तुम्ही धनंजय मुंडेंना क्लिनचीट देणार असाल तर ही अवघड बाब आहे. इतके नालायक सरकार मी आतापर्यंत बघितले नाही. आमचा आता सरकारवरचा विश्वासच उडालाय. तुम्ही धनंजय मुंडेंना चौकशीपासून टाळायला लागलात, आता तुम्हाला नाकीनऊ आणणार, असा इशाराच त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिला.

घातपात प्रकरणात धनंजय मुंडे यांना पोलिसांकडून चौकशीसाठी बोलावले जात नसल्याने जरांगे हे कमालीचे संतापले आहेत. मुंडे यांना फडणवीस, अजित पवार वाचवत असून आता तुम्हाला नाकीनऊ आणतो, असा इशाराच जरांगे यांनी दिला. आता मला मारण्यासाठी कोण कोण येतो ते बघतो असे आव्हान जरांगे यांनी धनंजय मुंडेंना दिले.




# बिकट वाट वहिवाट...



## संपादकीय



बिहारचे ३५वे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांनी काल पदाची शपथ घेतली, तेव्हा त्यांनी भारतात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदी राहिलेल्या आतापर्यंतच्या पहिल्या दहा मुख्यमंत्र्यांत आपलं स्थान नक्की केलं. या यादीत सिक्कीमच्या पवनकुमार चामलिंग, ओडिशाच्या नवीन पटनाईक, पश्चिम बंगालच्या दिवंगत ज्योती बसू, अरुणाचल प्रदेशच्या गेगॉंग अपांग, मिझोरामच्या लाल ठाणवाला, हिमाचल प्रदेशच्या वीरभद्र सिंग आणि त्रिपुराच्या माणिक सरकारनंतर त्यांचा नंबर लागला असला, तरी त्यांची ही कारकीर्द किती मोठी ठरते, यावर ते या यादीत किती पायऱ्या वर चढणार, ते ठरेल. गंमत म्हणजे, ज्या लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला सुरुवात केली, काही काळ त्यांच्याबरोबर सत्तेतही राहिले, वैचारिक सहप्रवासी म्हणून सरकार बनवताना एकत्र निर्णय घेतले, त्या लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलाला पराभूत करूनच नितीश कुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. १९८९ ची लोकसभा आणि १९९० ची विधानसभा निवडणूक लालूप्रसाद आणि नितीश कुमार यांच्या एकत्रित नेतृत्वाखाली लढवली गेली होती. पण, मुख्यमंत्री झाल्यानंतर लालूंचे रंग बदलू लागले. त्या वादातून १९९४ मध्ये जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली 'समता पार्टी' ची स्थापना झाली. लालूंचा सामाजिक न्यायाचा अजेंडा तेव्हा एवढा जोरात होता, की समता पार्टीला यश मिळणं शक्यच नव्हतं. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज आणि नितीश यांनी त्यामुळे १९९८ मध्ये एकत्र येऊन (मुख्यतः बिहारला डोळ्यासमोर ठेवून) राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन' ची स्थापना केली. या आघाडीने नितीशना खरी चाल दिली. चारा घोटाळ्यात लालूंची प्रतिमा धुळीला मिळाली असताना तुरुंगात जाण्यापूर्वी त्यांनी राजकारणात पूर्ण अननुभवी असलेल्या पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने त्यांची होती नव्हती तीही मान्यता संपली. परिणामी सन २००० पर्यंत लालूंचा जनाधार घटत गेला आणि नितीश कुमार यांचा वाढत गेला! सन २००० मध्येच नितीश कुमार यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. पण, ते सरकार प्रत्यक्षात आलंच नाही. त्याची नुकसानभरपाई म्हणून नितीश कुमार यांची वर्णी थेट अटलजींच्या मंत्रिमंडळात, केंद्रात लागली. तिथे त्यांनी आपल्या प्रशासन कुशलतेचा चांगला ठसा उमटवला. देशभर त्यांची प्रतिमा तयार झाली. लालूंवर भ्रष्टाचाराची एकामागोमाग एक प्रकरणं शेकत असताना, त्यातून सावरण्यासाठी त्यांनी घेतलेल्या 'अतिरेकी सामाजिक न्याया' च्या धोरणाने गांवागांवात वेगळ्या चर्चा सुरू झाल्या. लालू आणि नितीश यांच्यातील त्यावेळच्या तुलनेतच नितीश पुढे निघून गेले. लालू वेगवेगळ्या आरोपात अडकत गेले. लालू आणि नितीश यांचे राजकीय-सामाजिक विचार एक असले, तरी राजकीय मूल्यकल्पना कशा वेगळ्या होत्या, याचा एक किस्सा बिहारमध्ये चांगलाच प्रसिद्ध आहे. २००५ मध्ये विधानसभा निवडणुकीत 'राष्ट्रीय जनतांत्रिक गठबंधन' ला बहुमत मिळालं. पण, ते स्पष्ट बहुमत नव्हतं. काही आमदार कमी पडत होते. त्यावर तोडगा काढण्यासाठी समता पार्टीचे अध्यक्ष म्हणून जॉर्ज यांच्या निवासस्थानी एक बैठक बसली. बैठकीला नितीश कुमार, शरद यादव, दिग्विजयसिंह असे चार-पाच महत्त्वाचे नेते होते. बरीच आकडेमोड करूनही गणित जुळत नव्हतं. शेवटी आपल्यातल्याच काही आमदारांशी बोलून निधीची व्यवस्था करावी आणि त्यातून सरकार स्थापनेच्या प्रक्रियेला गती द्यावी, अशी सूचना पुढे आली. ती सूचना ऐकून नितीश कुमार यांनी जागच्या जागी त्या सूचनेला तीव्र विरोध केला.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | 2 | | | 5 | | | 9 |
| | 8 | | 2 | 6 | | | 1 | |
| | | 6 | | | 7 | | | 4 |
| | 4 | | | 8 | 9 | | | 2 |
| 8 | | 3 | 1 | | 2 | 4 | | 6 |
| 2 | | | 3 | 4 | | | 5 | |
| 3 | | | 4 | | | 9 | | |
| | 1 | | | 2 | 8 | | 4 | |
| 7 | | | 5 | | | 2 | | 1 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 7 | 8 | 4 | 9 | 3 | 1 | 6 | 5 |
| 9 | 1 | 5 | 2 | 6 | 7 | 4 | 3 | 8 |
| 6 | 3 | 4 | 8 | 1 | 5 | 7 | 2 | 9 |
| 1 | 6 | 9 | 3 | 2 | 8 | 5 | 7 | 4 |
| 3 | 5 | 2 | 1 | 7 | 4 | 8 | 9 | 6 |
| 8 | 4 | 7 | 6 | 5 | 9 | 3 | 1 | 2 |
| 5 | 9 | 3 | 7 | 8 | 2 | 6 | 4 | 1 |
| 4 | 2 | 6 | 5 | 3 | 1 | 9 | 8 | 7 |
| 7 | 8 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 | 3 |

२१ नोव्हेंबर २०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:प्रतिपदा १४:४७:३२
नक्षत्र:अनुराधा

१३:५५:३८
योग:अतिगण्ड
१०:४३:००
करण:बव १४:४७:३२
करण:बालव
२८:००:३८+

## उपदेशाचे डोस

### स्वप्न

देशातील सर्वात मोठ्या वेड्यांच्या दवाखान्याला देशमुखांनी भेट दिली. तेव्हा एका खोलीकडे हात करुन डॉक्टर म्हणाले, '' साहेब, येथे या खोलीत विमान चालविण्याचे, ते वेगाने पळविण्याचे स्वप्न पाहणारे वेडे आहेत.'' देशमुखांनी उत्सुकतेने खिडकीतून आत पाहिले तर त्यांना तेथे कोणीही दिसेना. तसे त्यांनी डॉक्टरांना विचारले. तेव्हा डॉक्टर म्हणाले, ''साहेब, ते सर्व वेडे खोलीतच आहेत. कदाचित पलंगाखाली झोपून, आपण विमानाच्या खालीच झोपलो आहोत, अशी कल्पना करुन विमान दुरुस्त करत असतील.''

आपण सामान्य माणसेही असेच कल्पनांचे, मनोरथांचे विमान पळविण्याच्या आहारी गेलो आहोत. परंतु त्या खोलीत जसे वेडे दिसत नव्हते, तसाच स्वत:चा वेडेपणाही आपल्याला दिसत नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७८३ - गरम हवा भरलेल्या बलूनच्या साहाय्याने माणूस प्रथम आकाशात गेला. या बलूनमध्ये हायड्रोजन भरलेला होता.
- १९१४ - इराकमधील बसराबंदर शाही भारतीय फौजांनी ताब्यात घेतले.
- १९१६ - आयर्विन लँगम्यूरने प्रस्फुरित नलिकेचा (ट्यूब) शोध लावला.
- १९६३ - थुंबा येथून पहिला अग्निबाण प्रक्षेपित करण्यात आला.
- २००८ - अमेरिकी अंतराळ संस्थेच्या मार्स रिकोनाईसेन्स आर्बिटरने मंगळ ग्रहाच्या दगडी ढिगाऱ्यांत बर्फाच्या नदीचा शोध लावला.

### राष्ट्रीय

- १९५५ - संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या मोर्चावर गोळीबार, १५ ठार. पुढे आणखी ९० बळी मोरारजी देसाई यांच्या आज्ञेमुळे पडले.

### जन्म

- १६९४ - व्हॉल्तेर, फ्रेंच तत्त्वज्ञानी.
- १८५४ - पोप बेनेडिक्ट पंधरावा.
- १९३९ - मुलायमसिंह यादव, भारतीय राजकारणी.
- १९४३ - लॅरी महान, अमेरिकन काउबॉय.

### निधन

- ४९६ - पोप गेलाशियस पहिला.
- १८९९ - गॅरेट हॉबार्ट, अमेरिकेचा उपराष्ट्राध्यक्ष.
- १९१६ - फ्रांझ जोसेफ पहिला, ऑस्ट्रियाचा सम्राट.
- १९६९ - मुतेसा दुसरा, युगांडाचा राष्ट्राध्यक्ष.
- १९७० - सर सी.व्ही. रमण,

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४२



### आडवे शब्द

१. पोलिस
६. आत्याचा मुलगा
९. वजनदार
१०. फळातील द्रव
११. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा
१५. क्रिकेटमधील धाव
१६. प्रतिबंध, विरोध
१८. तमाशा
१९. तोंडाचा एक भाग
२१. रम्य
२२. वेडावाकडा
२४. मातीचा कण
२५. चर्चा
२७. भारतात वास्तव्य करणारे तिबेटी धर्मगुरु
२८. शेतकरी (हिंदी)
३०. हाडांचा सापळा
३२. प्रत्येक दिवशी
३४. धमकी, श्वास
३६. व्रत, नियम
३८. चेहरा
४०. रामाच्या चरित्रावरील नाट्यप्रयोग
४२. शंकर
४४. मृत्यूनंतर शरीराचे केलेले दान
४६. नवरसातील एक रस
४७. विनंती
४९. आनंद
५०. ट्रीपला मराठी शब्द
५२. अजगर
५३. काळ्या तोंडाचे माकड
५५. सत्त्व
५७. शहाणा, चलाख
५९. घरोघर
६०. श्रीरामाचे स्तोत्र
६२. भितीवरून सरपटणारा प्राणी
६३. घर
६४. महिना
६५. समशेर, ढाल ----
६७. चालू दिवस
६८. लहानसहान
७१. अभिनेता
७२. पंख, ७३. वर्ण
७५. गाणे
७७. नोकरी करणारा
८०. जरीने भरलेले वस्त्र
८१. मांडणी, सजावट
८२. भीतीने होणारी थरथर
८३. पुष्पराग, सत्त्व, तमबरोबरचा तिसरा गुण

### उभे शब्द

१. मावळ्यांची युद्धातील प्रोत्साहनपर घोषणा
२. दिवस
३. जावई (हिंदी)
४. दारूचा एक प्रकार
५. यावर्षी (ग्रा.)
७. तीन दिवसाचे फूल
८. अवधान, लक्ष
९. भारताचे पहिले पंतप्रधान
१२. चटकन
१३. धट्टाकट्टा
१४. धोबी
१७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२०. हिंदीत मोठा
२१. मला, वरचा माळा
२३. संध्याकाळ
२४. एखाद्याच्या बाजूने बोलणे, वकिली करणे
२६. त्याप्रमाणे
२९. मोठी नदी
३१. डावखोरा
३३. चित्तथरारक
३५. स्वत:ला
३७. मृत्यू
३९. रावण
४१. राजवाडा
४३. जल
४४. शरीर
४५. धमनी
४६. हाताचा तळवा
४७. लग्नसोहळा
४८. आशीर्वाद
५१. पैगंबर, राजा यांच्या नावापुढील बहुमानाचा शब्द
५२. पूर्ण भेदून जाणे
५४. नाशिकजवळून वाहणारी नदी
५६. मध्यम प्रमाण
५८. मुलगा, तनय
६१. धुणे
६४. मत्स्य
६६. मार्गक्रमण
६७. नौदल
६८. भाकरीचे एक धान्य
६९. खबदाड
७०. चषक
७२. अन्य, दुसरा
७४. मगज
७६. पान, पाकळी, तुकडी
७८. रचलेले कारस्थान
७९. निद्रा, झोप

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ४१ चे उत्तर

आडवे उत्तर : १.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.समोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

उभे उत्तर : १.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.मोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट

# स्पोकन इंग्लिश कार्यशाळेचा यशस्वी समारोप

**लोणावळा : (समर्थ गांवकरी)**

लोणावळा वुमेन्स फाउंडेशनतर्फे महिलांसाठी राबविण्यात आलेल्या ३-महिन्यांच्या स्पोकन इंग्लिश कार्यक्रमाच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचा आज यशस्वी समारोप करण्यात आला. या कार्यक्रमातून महिला सबलीकरण, कौशल्यविकास आणि वैयक्तिक प्रगतीला नवीन दिशा देण्याचा उद्देश साध्य झाला. "इंग्रजी शिकल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला असून आता रोजगाराच्या अनेक संधी आमच्यासमोर उपलब्ध होणार" अशा भावना यावेळी



उपस्थित महिलांनी व्यक्त केल्या. हा कार्यक्रम प्रियदर्शनी संकुल, वायसी क्लासेस, लोणावळा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी लोणावळ्यातील प्रतिष्ठित अधिवक्ता मोनाली कुलकर्णी- शेलार आणि रोटरी क्लब ऑफ लोणावळाच्या अध्यक्षा विजया कल्याण या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीने आणि मार्गदर्शनाने कार्यक्रमात उत्साहाची नवी भर पडली. या स्पोकन इंग्लिश कार्यशाळेची संकल्पना महिलांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांची संवादकौशल्ये विकसित करणे आणि रोजगार व शिक्षणाच्या संधींना नवी दिशा देणे ही होती. मागील तीन महिन्यांत सहभागी महिलांनी कुटुंब, नोकरी आणि इतर जबाबदाऱ्यांची तारेवरची कसरत करत अत्यंत समर्पणाने या प्रशिक्षणात सहभाग नोंदविला. यावेळी कार्यक्रमात सहभागी महिलांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. अनेक महिलांनी या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत फाउंडेशनने दिलेल्या संधींमुळे त्यांना नवे बळ आणि दिशा मिळाल्याचे सांगितले.

स्पोकन इंग्लिश कार्यशाळेत सहभागी महिलांचा मला अभिमान वाटतो. इंग्रजी शिकणे ही केवळ भाषा शिकण्याची प्रक्रिया नसून आत्मविश्वास आणि स्वावलंबनाकडे जाणारा महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच, लोणावळा वुमेन्स फाउंडेशन महिलांच्या स्वावलंबन, शिक्षण आणि विकासाच्या प्रवासाला बळकटी देण्यासाठी अशीच उपक्रमशीलता पुढेही सुरू ठेवणार आहे.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** नगर तालूक्यात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे समजल्यावर शेतकरी वर्ग भयभीत झालेला असून सध्या रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्यासाठी शेती पंपांना महावितरणने दिवसा वीजपुरवठा करावा अशी मागणी बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महावितरणचे उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

## थोडक्यात बातम्या...

### मायाताई तोडके बहाद्दरपुरा गणातून इच्छुक; निवडणूक लढवणार



**कंधार (स. गांवकरी) :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी बहाद्दरपुरा येथील मायाताई सुनील तोडके या पंचायत समिती बहाद्दरपुरा गणातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांकडे तिकीटाची मागणी केली आहे. मायाताई तोडके या महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे अनेक प्रश्न मार्गी लाऊन त्यांना आर्थिक बाबतीत निर्भर बनवण्याचे चांगले काम केले आहे. त्यांच्या या समाज कार्य लक्षात घेऊन त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळेल अशी त्यांना आशा असून, त्यांनी विधानसभेच्या निवडणुकी मध्ये बहाद्दूरपुरा येथून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बरीच मते मिळवून दिलीआहेत, तसेच माया तोडके यांनी त्यांच्या बचत गटामार्फत महिलांशी खूप चांगला संपर्क ठेवला असून त्यांनी बहाद्दरपुरा सर्कलमधील महिलांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला आहे या कार्यामुळे त्यांना अहिल्याबाई होळकर राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला असल्याने, त्याच्या कार्याची दखल घेत त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळेल असे जनतेतून बोलले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मुक्तेश्वर धोंडगे हे त्यांना उमेदवारी देण्यास मदत करतील असे जनतेतून बोलले जात असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर यांच्यासोबतही तोडके यांचे खूप चांगले संबंध असल्यामुळे त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बहाद्दरपुरा पंचायत समिती गणाचे तिकीट मिळाल्यास तोडके यांना त्याचा फायदा मिळणार असल्याचे जनतेतून बोलल्या जात आहे.

### शब्दगंध साहित्य पुरस्कार पुस्तके पाठवण्याचे आवाहन

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** "शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य च्या वतीने राज्यस्तरीय वाड:मय स्पर्धा आयोजित करण्यात आली असून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृती पाठवाव्यात,उत्कृष्ट साहित्यकृतीना शब्दगंध साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, " अशी माहिती शब्दगंध चे संस्थापक,सचिव सुनिल गोसावी व अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी दिली. गेल्या वीस वर्षापासून शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने राज्यस्तरीय वाड:मय स्पर्धा घेण्यात येतात.यावर्षी एक जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान प्रकाशित झालेले कथासंग्रह, काव्यसंग्रह, लेखसंग्रह, कादंबरी, आत्मचरित्र, संशोधन ग्रंथ,ललितसंग्रह,बालवाड:मय इ प्रकारातील पुस्तकांच्या तीन प्रती,परिचय,५ रु पोस्टाची ५ तिकिटे यासह शब्दगंध साहित्यिक परिषद, फुलोरा,लक्ष्मी कॉलनी,भिस्तबाग महालाजवळ,तपोवन रोड, सावेडी अहिल्यानगर –४१४००३ मो.क्र.९९२१००९७५० येथे पाठवाव्यात. परिक्षण झाल्या नंतर सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात लेखक,कवींना शब्दगंध साहित्य पुरस्कार देऊन मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात येणार आहे.सन्मानपत्र, सन्मान चिन्ह,शाल असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे. तरी जास्तीत जास्त नवोदितांनी शब्दगंध साहित्य पुरस्कारासाठी आपली पुस्तके पाठवावेत,असे आवाहन कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडूळे,उपाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ.जी. पी.ढाकणे,कार्यवाह भारत गाडेकर,खजिनदार भगवान राऊत, राज्य संघटक प्रा.डॉ.अशोक कानडे यांनी केले आहे.

### नेवासा येथील मेन रोडवरील आगीच्या भक्ष्यस्थानी आठ दुकाने जळून खाक



**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** नेवासा शहरातील नगरपंचायत चौकात मेन रोडवरील आठ दुकाने जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना काल रात्रीच्या सुमारास घडली. काल रात्री दुकानांना अचानक लागलेल्या आगीने शहरात खळबळ उडाली. सलून, मोबाईल शॉप, बॅग हाऊस, प्रसाधनालय, कोल्ड्रिंक्स शॉप, गॅस शेगडी रिपेरिंग, केक शॉप व किड्स वेअर दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी आली. दरम्यान, या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून, याप्रकरणाचा तपास सुरु झालेला आहे. परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात मदतकार्यासाठी धावून आले होते. नेवासा नगरपंचायत व ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले होते. पोलीस प्रशासनातर्फे गर्दी नियंत्रणासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले होते. दरम्यान, अचानक आग लागल्यामुळं परसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र, ही आग नेमकी कशामुळं लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. या आगीत एकूण आठ दुकाने जळून खाक झाली आहेत. यामुळं व्यवसायिकांचं लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे.

# गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी निधी द्या : खा. नीलेश लंके यांचा प्रस्ताव

- स्वदेश दर्शन २.० व प्रसाद योजनेअंतर्गत विशेष निधीची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे शाश्वत संवर्धन, पर्यटन सुविधांचा विकास आणि वारसा सर्किट उभारण्यासाठी केंद्र सरकारकडे विशेष निधीची मागणी करत खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना सविस्तर प्रस्ताव पाठवला आहे. राज्यातील किल्ल्यांना राष्ट्रीय वारसा आणि पर्यटन



दृष्टीने जागतिक स्तरावर नेण्याचा हा व्यापक प्रयत्न मानला जात आहे. खा.लंके यांनी पाठवलेल्या प्रस्तावात नमूद केले की, महाराष्ट्रातील शिवकालीन किल्ले स्थापत्य, इतिहास, स्वातंत्र्यलढा आणि साम्राज्यनिर्मितीच्या वैभवाचा ठसा आजही जपून ठेवतात. मात्र अनेक किल्ल्यांवर जिर्ण प्रवेशमार्ग, पाणी-शौचालयांचा अभाव, माहिती फलक नसणे, मार्गदर्शकांची कमतरता, पर्यटन केंद्र नसल्याने संपूर्ण पर्यटन क्षमता वापरली जात नाही. खा. लंके यांनी आपल्या प्रस्तावात नमूद केले की, त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आपला मावळा ही युवा संस्था विविध किल्ल्यांवर कचरा निर्मूलन, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, ऐतिहासिक जनजागृती, असे उपक्रम राबवत आहे. या स्वयंसेवी प्रयत्नांना शासकीय पाठिंबा व निधी मिळाल्यास संवर्धन अधिक प्रभावी होईल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. पर्यटन मंत्रालयाने आव्हान आधारित गंतव्यस्थान विकास उपक्रमांतर्गत अहिल्यानगरच्या भुईकोट किल्ल्याच्या विकासासाठी २४.९९ कोटी रूपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल खा. लंके यांनी कृतज्ञता व्यक्त केली. याच धर्तीवर संपूर्ण राज्यासाठी एकात्मिक किल्ला सर्किट उभारण्याची त्यांनी मागणी केली आहे. या प्रस्तावात खासदार लंके यांनी प्रस्तावित केलेले किल्ला सर्किट पुढीलप्रमाणे : शिवनेरी-पुणे; छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान, धरमवीर गड-अहिल्यानगर; छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्यस्थळ, रायरेश्वर-पुणे; स्वराज्याची शपथ जिथे घेतली ती पवित्र भूमी, रामशेज-नाशिक; शिवकालीन सामरिक महत्व असलेला अजिंक्य किल्ला, तिकोणा-पुणे; अफझलखानवरील महत्वपूर्ण विजयाचे ऐतिहासिक स्थळ, प्रतापगड-सातारा; शिखर युध्दानंतरचे प्रमुख विश्रांतीस्थान, विश्रामगड-अहिल्यानगर; छत्रपती शिवाजी महाराजांचे लष्करी केंद्र, भुदरगड-कोल्हापूर; मराठा साम्राज्याच्या सामरिक व्यवस्थेचा आधारस्तंभ.

**प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे**

किल्ल्यांवर पर्यटन पायाभूत सुविधा उभारणे, रस्ते, पाण्याची सोय, शौचालये, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग इ. डिजिटल माहिती केंद्र आणि ई-तिकीटिंग, ऐतिहासिक माहितीचा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे प्रसार, स्वच्छता व पर्यावरणपूरक वाहतूक, नैसर्गिक वारसा जतन करण्यासाठी शाश्वत पर्यटन, स्थानिक तरूणांसाठी रोजगारनिर्मिती, मार्गदर्शक, तिकीटव्यवस्था, व्यवस्थापन या क्षेत्रात भर, स्वयंसेवी संस्थांच्या सहभागाला मान्यता, आपला मावळासारख्या संस्थांना थेट सहभागी करण्याचा प्रस्ताव.

# चार हजाराची लाच घेणारा ग्रामसेवक एलसीबीच्या जाळ्यात

**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

घरकुल मंजुरीच्या प्रस्तावासाठी चार हजाराची लाच मागणाऱ्या ग्रामसेवकाला एलसीबीने रंगेहात पकडले असून ही कार्यवाही बुधवारी दिनांक १९ रोजी एलसीबी पथकाने पंचायत समिती परिसरात केल्याने खळबळ उडाली आहे. भायेगाव सजयाचे ग्रामसेवक वामन बिरादार यांना एलसीबीने तात्काळ अटक करून त्यांना नांदेडला हलविले आले आहे. औरंगाबाद येथील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत चे पथक तालुक्यातील मौजे येरगी येथील कामाची पाहणी करण्यासाठी आले असताना ही घटना येथे उघडकीस आल्याने पंचायत समिती प्रशासनात खळबळ उडाली आहे. तालुक्यातील मौजे भायेगाव येथील ग्रामपंचायत सदस्य यांना शासनाच्या योजनेतून घरकुल हवे होते, त्यासाठी त्यांनी घरकुल मंजुरीचा प्रस्ताव ग्रामसेवकाला देण्यासाठी गेले असताना ग्रामसेवक वामन बिरादार यांनी त्या सदस्याकडे चार हजाराची रक्कम लाच म्हणून मागितली. परंतु त्यांची लाच देण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी सरळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे यासंबंधीची तक्रार केली.

# महायुती स्वबळावर तर 'मविआ' वंचित सोबत

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या कंधार नगर पालिका निवडणुकीत भाजपतर्फे गंगाप्रसाद यंन्नावार, काँग्रेस वंचित बहुजन आघाडीतर्फे शहाजी नळगे तर राष्ट्रवादी अजित पवार पार्टी तर्फे स्वप्रिल पाटील लुंगारे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. या निवडणुकीत महायुतीतील भाजप व राष्ट्रवादी पक्ष स्वबळावर उतरल्याने कोण विजयी होणार हे आज घडीला सांगणे अवघड आहे.



पालिका निवडणूक महायुती व 'मविआ' एकत्रपणे लढतात की स्वबळावर यावर अनेक दिवस चर्चा रंगली होती. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व कंधारचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यातील राजकीय शत्रुत्व जिल्ह्यात प्रसिद्ध असल्याने जिल्ह्यात एखादे वेळी युती झाली तरी कंधारमध्ये मात्र भाजप व राष्ट्रवादीतील युती अभेद राहणार नाही, राष्ट्रवादी स्वबळावर लढणार असे बोलले जायचे. अन् झालेही तसेच. कंधार मध्ये महायुती अभेद राहिली नाही. नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची तारीख दोन दिवसावर आली असल्याने कोण कोणते अपक्ष उमेदवार अर्ज मागे घेणार आणि कोण कोण अर्ज ठेवणार हे २१ नोव्हेंबरला कळणार आहे. त्यामुळे कोणत्या पक्षाची लढत कोणत्या पक्षाच्या उमेदवार सोबत होईल हे स्पष्ट होईल. विविध पक्षांना पैकीला पैकी उमेदवार मिळाले नसल्याने मतदारांत एक चर्चेचा विषय बनला आहे. उपऱ्या उमेदवारांना काही पक्षाने उमेदवारी दिली आणि पक्षाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी नाकारल्याने काही जणांनी दुसऱ्या पक्षाची उमेदवारांनी घेतली तर काही कार्यकर्ते उमेदवारी दिली नसल्याने आपल्या नेत्यावर संताप व्यक्त करीत आहेत. अध्यक्षपदासाठी आठ अर्ज भरण्यात आले होते. त्यातील तीन अर्ज दि. १८ रोजी बाद ठरले आहेत. सदस्य पदासाठी एकूण १२० अर्ज भरण्यात आले होते. छाननीत २० अर्ज अपात्र ठरले आहेत. आता १० प्रभागात १०० तर अध्यक्षपदासाठी ५ अर्ज आहेत. २१ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असून त्या दिवशी नगरपरिषद निवडणुकीत कोण राहणार , कोण नाही याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# शेखर रवजियानी यांच्या सांगीतिक संवाद सत्राचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल हडपसर कॅम्पस मध्ये प्रसिद्ध भारतीय संगीतकार आणि मार्गदर्शक शेखर रवजियानी यांच्या सांगीतिक संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

ग्लोबल स्कूल्स ग्रुप लीडरशीप लेक्चर सीरीजच्या अंतर्गत या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सेशनच्या एलएलएस सीरीजमधे जीआयआयएस बालेवाडीच्या विद्यार्थ्यांनी ही सहभाग घेतला.



या प्रोग्रॅमद्वारे सर्जनशीलता, उत्सुकता आणि महत्त्वाकांक्षेला चालना देत वर्गातले शिक्षण आणि प्रत्यक्ष आयुष्यातील अनुभवांचा मेळ घालण्याचे उद्दिष्ट आहे.

एलएलएस सेशन्सचा एक भाग म्हणून शेखर यांनी आपला संगीतकार म्हणून आतापर्यंतचा प्रवास उलगडला. सर्जनशीलतेचा विकास करण्यासाठी आवश्यक असलेली शिस्त, कामातील अस्सलपणा यांविषयीही त्यांनी आपली मते मांडली.

विद्यार्थी यावेळेस ताल, आवाजावरील नियंत्रण, स्टेजवरील सादरीकरण इत्यादींवर भर देणाऱ्या वर्कशॉपमधे सहभागी झाले होते. त्यानंतर प्रश्नोत्तरे व विद्यार्थ्यांचे सादरीकरण झाले.

या सेशन विषयी शेखर रवजियानी म्हणाले, 'ग्लोबल स्कूल्स ग्रुप कॅम्पसला भेट दिल्यानंतर प्रत्येक वेळेस मला तरुण मुलांमधे असलेली पॅशन आणि उत्सुकतेचं दर्शन घडतं. जीआयआयएस हडपसरमधली मुलं उत्सुक, गुणवान आणि कलात्मक पाठपुराव्यासाठी आवश्यक असलेले गुण शिकण्यासाठी आतुर आहेत.

# पं. नेहरूंची कारकिर्द म्हणजे विकासाभिमुख जडणघडण

**देगलूर : (समर्थ गांवकरी)**

भारत ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त झाला त्यावेळी दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, सार्वजनिक आरोग्य, निरक्षरता, शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न अशा अनेक समस्या नवस्वतंत्र भारतासमोर होत्या. पंडित नेहरूंनी पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून या विविध समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला, अर्थात पंडित नेहरूंची कारकीर्द म्हणजे विकासाभिमुख जडणघडण होय, असे मत उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून दिनांक १४ नोव्हेंबर २५ रोजी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

# लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचा हक्क बजावणे अत्यावश्यक : प्रसाद मते

**मतदान जनजागृती अभियान कार्यक्रम**

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

जगात भारताची लोकशाही सर्वश्रेष्ठ गणली जाते.यामध्ये मतदान ही सर्वात महत्त्वाची बाब असून लोकशाहीच्या बळकटीसाठी नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावणे, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी व्यक्त केले. शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयात आयोजित मतदान जनजागृती अभियान कार्यक्रम प्रसंगी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मतदान जनजागृती तालुका नोडल अधिकारी रामनाथ कराड , विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उपमुख्याध्यापक अशोक गर्जे, पर्यवेक्षक श्रीमती मनिषा मिसाळ,भारत गाडेकर, सुधाकर सातपुते, कार्यालयीन प्रमुख महेंद्र राजगुरू यासह मतदान जनजागृती अभियानाचे सदस्य अमोल तांदळे, संतोष घोगरे, राजेंद्र चव्हाण, सचिन साळवे,बिपिन खंडागळे,निखिल बोरुडे या सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी मतदान जनजागृती उपक्रम अंतर्गत विद्यालयांमध्ये मतदान विषयक रांगोळी स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा,निबंध स्पर्धा,



मतदान जनजागृतीपर रॅली इ. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यालयातील शिक्षक बाळासाहेब गांगुर्डे यांनी प्रथम विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती पर शपथ दिली. त्या नंतर मोठ्या उत्साही वातावरणामध्ये रॅली काढण्यात आली. सदर रॅलीत विद्यालयातील एन .सी .सी . पथक, स्काऊट गाईड पथक या सह नववी व अकरावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या भव्य रॅलीदरम्यान "मत द्या – देश घडवा","माझा मताधिकार – माझा अभिमान ,"मतदार राजा जागा हो - लोकशाहीचा धागा हो " अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या कार्यक्रमाचे प्रास्तविक नोडल अधिकारी रामनाथ कराड यांनी केले. सुत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक सुनिल कटारिया यांनी केले तर आभार प्राचार्य अजय भंडारी यांनी मानले. यावेळी विविध स्पर्धा संपन्न झाल्या त्याचा निकाल पुढीलप्रमाणे निबंध स्पर्धा:गौरी संजय गरड - प्रथम, सपना शिंदे- प्रथम, वैष्णवी प्रदीप दिवटे- द्वितीय, सोफिया फिरोज शेख- द्वितीय, मिहिर खाबिया- तृतीय, बिजा बेग- तृतीय, उत्तेजनार्थ-प्रज्ञा केकान, कार्तिक दहिफळे, साक्षी नरेश चिंतामणी. रांगोळी स्पर्धा: आरती राख- प्रथम, वैष्णवी दहिफळे- द्वितीय, श्रुती भागवत- तृतीय, वेदिका वारे- उत्तेजनार्थ. मतदान जनजागृती बाबत अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम आयोजित केले बाबत तहसीलदार डॉ. उद्धव नाईक व सपना वसावा(मुख्यकार्यकारी अधिकारी) नगर परिषद पाथर्डी यांनी सर्व मतदान जागृती टीम व शाळेतील शिक्षक यांचे अभिनंदन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# रावेर पोलिसांची हतभट्टी विरुद्ध संक्रांत

## तापी नदीकीनार पट्ट्यातील हात भट्या उद्धवस्त



**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील थेरोळा येथे तापी नदीचे काठावर काही इसम हे अवैधरित्या गावठी हात भटटीची दारु तयार तीची चोरटी विक्री करीत आहेत. अशी माहिती व तक्रारी रावेर पालिसांना मिळाली होती . त्या अनुशंगाने पंचासमक्ष खात्री केली असता सदर गुप्त माहीती ही खरी असल्याची आढळून आल्याने , थेरोळा गावा जवळील तापी नदीचे काठावर एकांतात झाडा झुडपात एक इसम दगडाची चुल तयार करून त्यावर लाकडावा जळ लावून पत्री इम ठेवून त्यात दारु बनविण्याचे रसायन टाकुन गावठी हात भटटीवी दारु तयार करत असतांना आढळून आला आहे.

सदर आरोपी नामे महेंद्र रघुनाथ अटकाळे वय ५४ स येरोळा ता. रावेर यां चे जवळून ५२५०/- रुपये किमतीचे गुळ मोह मिश्रीत उकळते १५० लीटर पक्के रसायन, १०,५००/- रुपये किमतीचे 300 लीटर कच्चे रसायन, 3000/- रुपये किमतीची हात भट्टी ची दारु, असे एकुन १८७५०/- रुपये किमतीचे कच्चे पक्के रसायन नाश करण्यात आले आहे. सदर आरोपीता विरुध्द रावेर पोलिस स्टेशन येथे गुरंन ४६७/२०२५ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ व्या कलम १५ (क) (4) (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेव सवेर गुन्हे शोध पथक ही कार्यवाही करीत असतांना थेरोळा गावाजवळील अन्य एका दसऱ्या ठिकाणी तापी नदीच्या किनारी जेथे पायी जाण्याकरीता कोणाताही रस्ता नसतांना एक इसम दारुची भट्टी चालवित असल्याची माहीती प्राप्त झाल्याने ,रावेर गुन्हे शोध पथकाने सदर ठिकाणी नावेने जावून खातरजमा केली असता ,तेथे तापी किनाऱ्याला लागून प्रडगळीच्या ठिकाणी कोणासही नजरेस पडणार नाही अशा ठिकाणी हात भट्टी वालु असल्याचे दिसले.




कळवण तालुक्यातील जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजनांचे फलित पोहोचण्यासाठी जे अधिकारी दिवस-रात्र संघर्ष करतात, त्यांचं कार्य अनेकदा गावी-खेड्यातील शांत वाड्या–वस्त्यांत दडलं जातं. पण कळवण पंचायत समितीच्या मा. गटविकास अधिकारी मा. श्रीमती वंदना सोनवणे मॅडम यांनी मात्र हे चित्र बदलून दाखवलं—अखंड सेवा, 'प्रशासन म्हणजे जनतेची सेवा' ही भूमिका त्यांनी प्रत्यक्षात साकारली.

## थोडक्यात बातम्या...



### दिव्यातील कचराकोंडी; भाजपकडून कचरा प्रभाग समितीच्या दारावर

**ठाणे (स. गांवकरी) :** ठाणे महानगर पालिकेची कचराकोंडी झाल्याने प्रशासनावर ताशेरे ओढले जात आहेत. कळवा, मुंब्रा नंतर आता दिवा शहरातील कचरा प्रश्न देखील चिघळला आहे. दिवा विभागात गेल्या ८ ते १० दिवसांपासून कचरा उचलण्याचे काम ठप्प झाल्यामुळे संपूर्ण शहरात व रहिवासी इमारतीमध्ये कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले गेले आहे. परिणामी प्रचंड दुर्गंधी पसरू लागल्याने रस्त्यांवरून जाणेही नागरिकांसाठी अत्यंत जिकरीचे झाले असून दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाच्या घनकचरा विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे. दिवा शहरात कचराकोंडी झाल्याने प्रशासनाचा निषेध म्हणून दिवा भाजपकडून दिवा प्रभाग समितीच्या कार्यालयाच्या गेट वर टाकून निषेध नोंदविण्यात आला. प्रसंगी भाजप दिवा शीळ मंडळ अध्यक्ष सचिन रमेश भोईर, महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सपना भगत, ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष विजय भोईर, रोशन भगत, प्रवीण पाटील, नितीन कोरगावकर, साधना सिंह, पुनम सिंह, अनुराग पाटील, विजय वाघ, कल्पेश सारस्वत, तसेच भाजपच्या अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मिळून दिवा विभागातील कचरा थेट दिवा प्रभाग समितीच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयासमोर टाकून तीव्र निषेध व्यक्त केला. पालिका प्रशासनाने तात्काळ कचरा उचलण्याची कार्यवाही सुरू न केल्यास अधिक आक्रमक आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात येईल असे मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी स्पष्ट केले.

### पिंपळगाव म. पंचायत समिती गणातून सौ. कालिकाताई पवार इच्छुक

**अर्धापूर (स. गांवकरी) :** पिंपळगाव महादेव पंचायत समिती गणातून शिवसेना उबाठाच्या उपसरपंच सौ.कालिकाताई भगवान पवार निवडणूकीत इच्छुक उमेदवार असल्याची माहिती समोर येत आहे. अर्धापूर पंचायत समीती पिंपळगाव म.गण सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित असल्याने या गणाकडे तालुक्याचे लक्ष लागले असून या गणातून उबाठाचे उमेदवार म्हणून सौ.कालिकाताई भगवान पवार निवडणूक लढविण्यासाठी शिवसेना उबाठा कडे उमेदवारी मागणी केली आहे.या गणात पिंपळगाव म,शेलगाव खुर्द,शेलगाव बु.,दाभड,बामणी,जांभरुण,शहापूर वाडी आदी ग्रामपंचायती असून या गावात उबाठाचे युवासेना भोकर विधानसभा प्रमुख भगवान पवार हे गेल्या पंधरा वर्षापासून कट्टर शिवसैनिक म्हणून जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, जिल्हा संघटक बालाजी कल्याणकर, तालुकाप्रमुख संतोष कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली काम करतात व जनतेच्या नेहमी संपर्कात राहतात. यामुळे पिंपळगाव म.पंचायत समिती गणातून उपसरपंच सौ.कालिकाताई भगवान पवार उबाठा शिवसेना कडून निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवार असुन पक्षाने संधी दिल्यास निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची माहिती दिली आहे.

### शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पुणे जिल्हा प्रमुख पदी अक्षय कुटे यांची निवड



**शिवनेरी (स. गांवकरी) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष पुणे जिल्हाप्रमुख पदी अक्षय किसन कुटे यांची निवड करण्यात आली आहे . शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून गोरगरीब , गरजू आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयात राखीव घाटा उपलब्ध करून देणे . गरीब रुग्णावर मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया संदर्भात मदत करणे .अक्षय कुटे यांनी जुन्नर तालुक्यात आदिवासी दुर्गम भागामध्ये सातत्याने रुग्णांना मदत केली . कोरोनाच्या काळात सुद्धा रुग्णांना फार मोठी मदत झालेली आहे . या कार्याची दखल घेऊन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष संस्थापक कक्ष प्रमुख मंगेश चिवटे व कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांनी निवड केली आहे.

### मिरजगावात सीसीआय अंतर्गत कापूस हमीभाव खरेदी केंद्र सुरू

**कर्जत ता (स. गांवकरी) :** कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील छत्रपती जिनिंग अँण्ड प्रोसिंग प्रा.लि. येथे गुरूवार दि.२० नोव्हेंबर पासून सी.सी.आय अंतर्गत कापूस हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. येथील छत्रपती जिनिंग प्रेसिंग प्रा.लि. याठिकाणी कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ( सी.सी. आय) अर्थात भारतीय कापूस प्राधिकरण अंतर्गत किमान आधारभूत दरानुसार कापूस हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्रावर चांगला प्रतिचा (सुपर) कापसाला प्रति क्विंटल ८ हजार ०६० रूपये भाव देण्यात आला आहे. सी.सी.आय अंतर्गत कापूस हमीभाव खरेदी केंद्रामुळे शेतकऱ्यांच्या पदरी चांगला भाव मिळून अधिकचे पैसे मिळणार आहेत. आज रोजी केंद्र सुरू झाले असता, शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आपला कापूस विक्रीसाठी आणला होता. केंद्र सुरू झाल्याच्या पहिल्या दिवशीच या केंद्रावर बऱ्यापैकी कापसाची खरेदी झाली आहे. सी.सी.आय अंतर्गत सुरू झालेल्या या कापूस हमीभाव केंद्राचा छत्रपती जिनिंग ॲण्ड प्रोसिंग याठिकाणी गुरूवारी शुभारंभ करण्यात आला.

# अहिल्यानगर रनर्स क्लबचा खडकवासला अल्ट्रा २०२५ मधील ऐतिहासिक पराक्रम - जगदीप मकर



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर रनर्स क्लब (ARC) ने अभिमानास्पद कामगिरी करत जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच ११ रनर्सनी अधिकृत प्रमाणपत्रासह १०० किमी अंतर पूर्ण करून खडकवासला अल्ट्रा मॅरेथॉन २०२५ मध्ये इतिहास रचला आहे.

हा एक ऐतिहासिक पराक्रम असुन महाराष्ट्रातील सर्वात आव्हानात्मक मॅरेथॉनपैकी एक असलेली ही मॅरेथॉन शारीरिक आणि मानसिक सहनशक्तीची खरी परीक्षा घेते.असे प्रतिपादन जगदीप मकर यांनी केले.

अहिल्यानगर रनर्स क्लब ने खडकवासला येथे मिळविलेल्या नेत्रदीपक यशा बद्दल सर्वांचे आभार व्यक्त करताना श्री.मकर बोलत होते. यावेळी सर्व सदस्य उपस्थित होते. ते म्हणाले

एवढ्या कठीण १०० किमी अंतराचे पूर्णत्व स्वतःतच मोठे यश असून, ११ ARC रनर्सनी एकत्रितपणे ही कामगिरी करून अहिल्यानगर ने जिल्ह्याच्या रनिंग क्षेत्रात नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. याचे सर्व श्रेय खेळाडूना जात आहे. असे ते म्हणाले.

१०० किमी व्यतिरिक्त, ARC च्या रनर्सनी इतर अंतरांमध्येही दमदार कामगिरी सादर केली. या व्यतिरिक्त झालेल्या कामगिरी बाबत माहिती दिली.

२५ किमी कॅटेगरी मध्ये एकूण ६ फिनिशर्स होते यामधे दिलीप पवार यांनी २ तास ९ मिनिटांत उत्कृष्ट धाव देत २रा रनर-अप होण्याचा मान मिळवला. तसेच विनायक क्षत्रिय, जगदीप मकर, वैभव शिर्के, अल्ताफ पठाण आणि स्वप्राली पारधी यांनी उत्तम कामगिरी केली.

३५ किमी कॅटेगरी एकूण 4 फिनिशर्स चेतन अग्रवाल, सुभाष यादव, परेश पटेल आणि स्मिता उकिर्डे यांनी यशस्वीरीत्या अंतर पूर्ण केले.

५५ किमी कॅटेगरी एकूण 3 फिनिशर्स कल्पेश पोखरकर, उदय गारकर आणि रवींद्र चौभे यांनी मध्यम-अल्ट्रा अंतर प्रभावी वेळेत पूर्ण केले.

१०० किमी कॅटेगरी एकूण ११ फिनिशर्स विलास भोजणे, संजय शेळके,हरीश काबरा, श्रीहरी तांबडे, निलेश संकलेचा,वैभव वाघ,गौतम जायभाय, डॉ.श्याम तारडे, प्रसाद तनपुरे, सूर्यकांत पारधी, विनायक दिकोंडा आणि योगेश खरपुडे या ११ रनर्सनी हे ऐतिहासिक अंतर पार केलं.

यावेळी योगेश खरपुडे म्हणाले अहिल्यानगर रनर्ससाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. १०० किमी फिनिशर्ससह सर्व कॅटेगरीतील आमच्या टीमची कामगिरी हे शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि टीमवर्कचे उत्तम उदाहरण आहे. दिलीप पवार यांच्या पोडियम फिनिशने या यशाला अधिक उजाळा दिला आहे. ही कामगिरी अनेक नव्या रनर्सना प्रेरणा देईल. अहिल्या नगर रनर्स क्लब हा शहरातील एकमेव नॉन-कमर्शियल आणि केवळ रनर्सच्या विकास व मार्गदर्शनावर लक्ष केंद्रित करणारा क्लब असून, अनुभवी तसेच नव्या रनर्सना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्याचे कार्य सातत्याने करत आहे.

गौतम जायभाय यांनी सांगितले की ही एकत्रित कामगिरी म्हणजे सातत्यपूर्ण तयारी, परस्पर सहकार्य आणि फिटनेस व लाँग डिस्टन्स रनच्या संस्कृतीचा प्रसार करण्याच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

टीम ARC ला हे यश मिळवण्यासाठी जगदीप मकर, योगेश खरपुडे, विलास भोजणे, गौतम जायभाय आणि डॉ.श्याम तारडे यांच्या योग्य मार्गदर्शनाने आणि प्रोत्साहनाने सर्व रनर्सनी सुरक्षितपणे व सक्षमपणे फिनिश करण्यास मोठी मदत झाली.

# पुष्पावती विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

स्नेहसंमेलनानिमित्त पुष्पावती विद्यालयात दरवर्षी प्रमाणे यावर्षीदेखील वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात आयोजित करण्यात आला. विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विविध सांघिक तसेच वैयक्तिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले कबड्डी,खो-खो,लंगडी,रस्सीखेच धावणे,उडी मारणे,गोळाफेक, थाळीफेक अशा विविध क्रीडा प्रकारांचा यात समावेश होता. स्पर्धांची सुरुवात क्रीडाज्योतीच्या आगमनाने झाली. यानंतर या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन डिंगोरे गावाचे माजी उपसरपंच राजेंद्र विठ्ठल उकिरडे यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बबन तांबे गावच्या सरपंच सीमा सोनवणे, उपसरपंच संपत खरात,निलेश लोहोकरे,संदीप शिंगोटे,समीर लोहोटे,फिरोज पठाण,महेश सुकाळे,तसेच माजी सैनिक चंद्रकांत मवाळ आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उद्घाटक राजेंद्र उकिरडे यांनी विद्यार्थ्यांना व्यायाम व खेळांचे महत्त्व पटवून सांगितले."मनाची एकाग्रता टिकवण्यासाठी शरीर सुदृढ असणे अत्यावश्यक आहे.

# ठेकेदारावर कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

■ पडघा ग्रामपंचायतीतील बोगस काम प्रकरण

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**






पडघा ग्रामपंचायत हद्दीतील बालाजी नगर येथे करण्यात आलेल्या भूमिगत गटाराच्या कामातील गंभीर अनियमितता आणि बोगस कामामुळे ग्रामस्थांमध्ये व्यापक नाराजी निर्माण झाली आहे. संबंधित काम ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून, भ्रष्टाचाराच्या हेतूने काम केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार कैलास ढमणे यांनी केला आहे. गटारावरील चेंबरची झाकणे काम पूर्ण झाल्यापासून तब्बल तीन वेळा बदलावी लागली, हे कामाच्या भयंकर निकृष्टतेचे द्योतक असल्याचे ढमणे यांनी सांगितले. वारंवार झाकणे तुटल्यामुळे चेंबर उघडे पडून अनेक अपघात घडले असून, जीवितहानी होण्याचीही शक्यता निर्माण झाली आहे. तक्रारीनंतर कार्यकारी उपअभियंता, जिल्हा परिषद ठाणे यांनी जागेवर पंचनामा करून हे काम निकृष्ट असल्याचे लेखी नमूद केले आहे. तसेच ग्रामपंचायतीला कामाची दुरुस्ती करून ठेकेदारावर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, आजपर्यंत ठेकेदारावर कोणतीही कारवाई न झाल्यामुळे संताप व्यक्त करत कैलास ढमणे यांनी १५ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास भिवंडी पंचायत समिती येथे बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. या प्रकरणातून ग्रामपंचायतीच्या कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आगामी काळात प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> ग्रामस्थांच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. निकृष्ट कामामुळे जनजीवन धोक्यात येत आहे.
> **- पत्रकार कैलास ढमणे**

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात कळवणची धडाडी




**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवण पंचायत समितीत आज मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत ग्रामपंचायत विभागासह सर्वच खात्यांचे धडाकेबाज मूल्यमापन करण्यात आले.पवार यांनी सरळ आणि स्पष्ट शब्दात सूचित केले की—"समृद्ध पंचायत राज अभियानात प्रत्येक ग्रामपंचायतीने 100 टक्के काम केलेच पाहिजे; कसूर चालणार नाही!"क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अभ्यासिका — प्रत्येक गावात सुरू करण्याचे आदेश स्पर्धा परीक्षा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आधार मिळावा, गावागावात शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रत्येक गावात सावित्रीबाई फुले अभ्यासिका सुरू करण्याच्या सक्त सूचना देत पवार यांनी अधिकारी वर्गाची कसून छाननी केली."गावांत शासकीय काम करताना अडचण आली तर मला थेट फोन किंवा मेसेज करा," अशी थेट हमीही त्यांनी दिली. नाविन्यपूर्ण उपक्रमाचे भरघोस कौतुक गटविकास अधिकारी वंदना सोनवणे यांच्या कल्पनेतून आणि आमदार*नितीन पवार यांच्या दळवट गावातून एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.बालदिनाच्या दिवशी जन्मलेल्या मुलीच्या नावाने लोकसहभागातून पोस्टात रु. 10,000 ची सुरक्षा अनामत ठेव करण्यात आली. ही अनामत मुलगी सोनाली धनराज गायकवाड यांच्या कन्येच्या नावाने करण्यात आली. या उपक्रमाची मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांनी बैठकीत प्रशंसा करत ग्रामसेवक पांडुरंग खिल्लारी, तसेच अंगणवाडी सेविका यांचा सन्मान केला. हेमलता पगार, ग्रामपंचायत अधिकारी, ओझर — आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार कोसुर्डे ग्रामपंचायत — आर.आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार हे सर्व पुरस्कार जिल्हा परिषद नाशिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शुभहस्ते प्रदान. बैठकीत उपस्थित मान्यवरअतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, उपजिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अकुनरी नरेश, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मारुती मुळे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य महेश पाटील, डॉ. वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल, इत्यादी मान्यवरांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली.बैठकीचे प्रास्ताविक प्रभारी गटविकास अधिकारी वंदना सोनवणे यांनी केले.

> कळवण तालुक्याचा सन्मान — तीन मानाचे पुरस्कार या वर्षी कळवण तालुक्याने जिल्हा पातळीवर तीन मोठे मानाचे पुरस्कार पटकावून चमक दाखवली.

# अहिल्यानगर मनपा निवडणूकीत राष्ट्रवादीची जोरदार तयारी

## राष्ट्रवादी पक्षाने रणशिंग फुंकली! आगामी महापालिका निवडणुकीसाठी नवी रणनीती तय



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी भवन येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने आयोजित राष्ट्रवादी विजय संकल्प मेळावा जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला.

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीला कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती लाभली. बैठकीला शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष निलेश मालपाणी, महिला शहराध्यक्षा नलिनी गायकवाड, कार्याध्यक्ष नामदेव पवार, संजय झिंजे, अनिकेत कराळे, चंद्रकांत उजागरे, सचिन नवगिरे, प्रकाश पोटे, नीताताई बर्वे, ॲड. शितोळे, फारूक रंगरेज, खुशी जाधव, रोहन शेलार,भिमराज कराळे,अक्षय भगत, दीपक सुडके, अभिषेक जगताप, नूर पठाण,चैतन्य ससे ,समीर पठाण, फराज पठाण, प्रशांत दरेकर,राहुल घोरपडे यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्यात तरुण कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. या बैठकीत पक्षाच्या पुढील निवडणूक रणनीतीसंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा झाली.

यावेळी जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर म्हणाले की, विजय संकल्प मेळाव्यात कार्यकर्त्यांची झालेली उत्स्फूर्त उपस्थिती पाहून पक्षाची ताकद पुन्हा स्पष्ट झाली. आगामी महानगरपालिका निवडणुकीत स्थानिक प्रश्नांवर प्रामाणिकपणे काम करणाऱ्या उमेदवारांना संधी देणार आहोत. महाविकास आघाडीसोबत लढण्याचा विचार असून, गरज पडल्यास स्वबळावरही आम्ही सक्षम आहोत. निष्ठावंत कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधीत्व मिळेल याची हमी दिली. तर

शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर म्हणाले की, महानगरपालिका निवडणूक ही स्थानिक प्रश्नांवर लढविली जाणारी निवडणूक आहे. नागरिकांचे प्रश्न प्रामाणिकपणे सोडवू शकणाऱ्या उमेदवारांनाच संधी दिली जाईल. १७ प्रभागांमध्ये महाविकास आघाडी व अन्य मित्रपक्षांसोबत निवडणूक लढविण्याचा विचार आहे. वेळ आली तर पक्ष स्वबळावर लढण्यासही पूर्णत तयार आहे. विधानसभेत पक्षासोबत निष्ठा ठेवून काम करणाऱ्यांना येणाऱ्या निवडणुकांमध्ये योग्य संधी दिली जाईल.निकृष्ट विकासकामे,शून्य नियोजन,भ्रष्टाचार,गुंडगिरी या विरुद्ध आमचे उमेदवार लढणार

लवकरच पक्षाध्यक्ष शशिकांत शिंदे व आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत सविस्तर रणनीती बैठकीचे आयोजन केले जाईल.

बैठकीदरम्यान अनेक इच्छुक उमेदवारांनी स्वतःची ताकद दाखवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांसह उपस्थिती दर्शविली.

राष्ट्रवादीच्या विजय संकल्प मेळाव्यामुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीचा ताप वाढला असून पक्ष आता सक्रिय तयारीसह रणनिती अंतिम करण्याच्या प्रक्रियेत आहे.

# एका वृक्षाच्या बदल्यात दहा रोपांची लागवड करणार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

आगामी कुंभमेळ्यानिमित्त देश- विदेशातील साधू- महंत येथे येतील. त्यांच्यासाठी साधूग्राम येथे व्यवस्था करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक तेवढेच वृक्ष काढण्यात येतील. ज्या वृक्षांचे पुनर्रोपण करणे शक्य आहे ते अन्यत्र स्थलांतरीत करण्यात येतील. तसेच एका वृक्षाच्या बदल्यात दहा रोपांची लागवड करून त्यांचे संवर्धन करण्यात येईल, अशी ग्वाही कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन यांनी दिली. महानगरपालिकेने साधूग्रामच्या जागेवरील वृक्ष हटविण्याबाबत



कार्यवाही सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री श्री. महाजन यांनी गुरुवारी सकाळी तपोवन परिसराला भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, माजी आमदार बाळासाहेब सानप आदींसह महानगरपालिकेचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले की, राज्य शासन पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कटिबद्ध आहे. साधूग्रामच्या जागेतील जुन्या वृक्षांना कोणताही धोका नाही. मागील आराखड्या प्रमाणे आताही कार्यवाही केली जाईल. ते करताना निसर्गाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेतली जाईल. तसेच फाशीचा डोंगर, पेठ रोड परिसरात नव्याने रोपांची लागवड करून त्यांचे संवर्धन केले जाईल. कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित आणि हरित होण्यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. गोदावरी नदी वर्षभर प्रवाहित राहील यासाठी उपाययोजना केल्या जातील. साधूग्राम संपादित जमिनीचा मोबदला देण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण होईल. तसेच नाशिक शहरात रस्त्यावर मध्यभागी असलेले जीर्ण आणि अपघातांना कारणीभूत वृक्ष काढून टाकण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असेही आवाहन मंत्री श्री. महाजन यांनी केले.

नाशिक शहरातील खड्डे बुजवण्याच्या कामाला गती देत रस्ते दुरुस्तीची कामे सुरू करण्यात आली आहेत. आगामी काळात रस्ते व्हाइट टॅपिंग, सिमेंटचे करण्यावर भर राहील. त्यामुळे रस्ते कायमस्वरूपी टिकून राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.



ठाणे, दिवा : दिवा शहरातील दिवा-आगासन या मुख्य रस्त्यावरील आर एन विद्यालयासमोरील रस्ता दुभाजक तात्काळ हटविण्यासाठी शाळा प्रशासनाने ठाणे मनपा व ठाणे शहर वाहतूक विभागाला सन २०२२ पासून अनेक निवेदने देण्यात आली असताना देखील अनेकवेळा पाठपुरावा करूनही प्रशासन निर्णय घेत नसल्याने मेस्टा संघटनेच्या वतीने आज आर एन महाविद्यालयासमोर रस्त्यावर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सदर शाळेसमोर रस्ता दुभाजक असल्याने विध्यार्थी वाहतूक रिक्षा व बस यांना अनेक अडचनींना सामोरे जावे लागत असल्याने वाहतूक कोंडी होत असते तर काही विध्यार्थी रस्ता दुभाजकावर चढून रस्ता ओलांडतात त्यामुळे अनेकदा आपघात झाले आहेत.

## थोडक्यात बातम्या...



### श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीच्या तयारीसाठी संयुक्त बैठक पार पडली

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : माजी मंत्री आदरणीय श्री. बबनराव पाचपुते साहेब यांच्या अध्यक्षतेखालीतसेच श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विक्रमदादा बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली...! माऊली संपर्क कार्यालय, श्रीगोंदा या ठिकाणी श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने माऊली संपर्क कार्यालयात माजी मंत्री आदरणीय श्री. बबनदादा पाचपुते साहेब यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच लोकप्रिय आमदार श्री. विक्रमदादा पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या पॅनेलमधील सर्व उमेदवार व प्रतिनिधींची संयुक्त बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत— सर्व उमेदवार व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन आगामी निवडणुकीत पक्षाची विकासाभिमुख भूमिका नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे संघटनात्मक समन्वय अधिक दृढ करणे प्रत्येक प्रभागात पॅनेलची ताकद वाढविण्याची रणनीती या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत उपस्थितांनी पूर्ण तयारीने, एकजुटीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने निवडणुकीचा सामना करण्याचा निर्धार व्यक्त केला. श्रीगोंदा शहराच्या विकासासाठी भाजपाच सक्षम पर्याय आहे, असा ठाम विश्वास सर्वांनी व्यक्त केला. आगामी दिवसांत प्रचार आणखी वेगाने राबवण्याचेही ठरले.

### युथफूल गाणे प्रदर्शित; रसिकांवर मोहिनी घालणार 'वंदे मातरम...' गाणे




पुणे (स. गांवकरी) : तरुणाईवर आधारलेल्या चित्रपटांनी नेहमीच रसिकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. अशाच तरुणाईची गोष्ट 'निर्धार' या आगामी मराठी संगीतप्रधान चित्रपटात पाहायला मिळणार आहे. 'निर्धार' या शीर्षकातच काहीतरी सांगायचे असल्याचे संकेत देणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. मनोरंजनासोबतच प्रबोधन करीत तरुणाईला नवी दिशा देण्याचेही काम करणारा हा चित्रपट येत्या २८ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातील युथफूल गाणे नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. प्रदर्शित झाल्यापासून हे गाणे सोशल मीडियावर रसिकांचे लक्ष वेधत आहे. निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी जयलक्ष्मी क्रिएशनच्या बॅनरखाली 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे लेखन दिनानाथ वालावलकर यांनी केले असून, दिग्दर्शन दिलीप भोपळे यांनी केले आहे. 'निर्धार'मधील 'वंदे मातरम...' हे आजच्या तरुणाईच्या उत्स्फूर्त भावना व्यक्त करणारे गाणे प्रदर्शित झाले आहे. लेखक-गीतकार दिनानाथ वालावलकर यांनी लिहिलेले हे गाणे लयश्री वेणुगोपाल आणि ओंकार सोनावणे यांनी गायले आहे. संगीत दिग्दर्शन आणि संगीत, संगीत संयोजन राज जनार्दन पादारे यांनी केले आहे. तरुण मुले-मुली ओपन जीपने रस्त्याने प्रवास करत असतानाचे हे गाणे आहे. त्यातील एक तरुण गिटार, तर दुसरा बासरी वाजवून गाण्यात सुरेल स्वर भरण्याचे काम करतो. अर्थपूर्ण शब्दरचना आणि कर्णमधूर संगीत हे या गाण्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. निसर्गरम्य लोकेशन्स आणि प्रसंगानुरूप सिनेमॅटोग्राफी ही या गाण्याची जमेची बाजू आहे. कथेच्या प्रवाहाशी एकरूप होणारे हे गाणे महत्त्वाची भूमिका बजावणारे आहे. कथानकाला गती मिळवून देणारे हे गाणे चित्रपटात एका महत्त्वाच्या टप्प्यावर येते.

### मुंगी येथील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा; प्रशासनाचे दुर्लक्ष



शेवगाव (स. गांवकरी) : तालुक्यातील मुंगी येथील गोदावरी नदीपात्रात अवैधरीत्या वाळू उपसा मोठ्या प्रमाणात सुरू असून महसूल व पोलिस विभाग मात्र या बेकायदेशीर प्रकाराकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यंदा गोदावरी नदीत आलेल्या महापुरानंतर मोठ्या प्रमाणात वाळू साठा झालेला आहे. उच्च प्रतीची असल्याने या वाळूला बांधकाम क्षेत्रातून मोठी मागणी आहे. पाण्याची पातळी घटताच दररोज रात्रंदिवस ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, या अवैध उपशामुळे रस्त्याच्या कडेला मोठे वाळू साठे निर्माण झाले असून वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत. अवजड वाहनांतून क्षमतेपेक्षा जास्त वाळूची वाहतूक होत असल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. स्थानिक पेट्रोल पंप परिसरातूनच या संपूर्ण वाळू तस्करीचे नियंत्रण होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. महसूल विभाग, तहसीलदार कार्यालय आणि पोलिस यंत्रणा असूनही हा अवैध उपसा निर्भयपणे सुरू असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. तातडीने वाळू उपसा बंद करावा, अन्यथा कठोर आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# दै. स. गांवकरीचे २८ वर्षे निष्ठावान वितरक पांडुरंग आरोटे यांचा वाढदिवस साजरा!





**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा या शांत आणि स्नेहपूर्ण गावात (रि. पोस्टमास्टर) मा. पाडुरंग धोंडिबा आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित वाढदिवस कार्यक्रमाची आनंददायी आणि भावनिक अशी वातावरणनिर्मिती झाली. गावातील सर्वच मान्यवरांच्या उपस्थितीत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात हा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी ब्राम्हणवाडा येथे भेट देऊन पाडुरंग आरोटे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. डॉ. आरोटे यांनी शाल, आकर्षक पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन त्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात केला. कार्यक्रमातील मान्यवरांची उपस्थिती: या वाढदिवस सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यामध्ये —संजय फुलसुंदर, महाव्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी नवनाथ पवार, अध्यक्ष, लहुजी शक्ती सेना डॉ. प्रदीप कुमकर चंद्रकांत गोंदके, माजी सरपंच, करंडी मीनानाथ दिघे, सचिव, विविध सहकारी सोसायटी संजय भाऊ गायकर, वृत्तसंपादन विभाग, दैनिक समर्थ गांवकरी व संपर्कप्रमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ या सर्वांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक उत्साहपूर्ण झाला. दैनिक समर्थ गांवकरीतील २८ वर्षांच्या सेवेला सलाम! कार्यक्रमादरम्यान पाडुरंग आरोटे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले—

"पांडुरंग मामा हे दैनिक समर्थ गांवकरीचे तब्बल २८ वर्षे निष्ठेने आणि प्रामाणिकपणे वितरक म्हणून सेवा बजावत होते. त्यांच्या मेहनतीमुळे आणि नियमिततेमुळे वृत्तपत्राची विश्वासार्हता सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचली. त्यांच्या सेवेची आठवण आजही प्रेरणादायी आहे." गावातील व उपस्थित मान्यवरांनी पांडुरंग आरोटे यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि निरोगी आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या कर्तृत्वाचा आणि सेवाभावी वृत्तीचा गौरव करत गावकऱ्यांनी वाढदिवसाचा हा सोहळा अधिक संस्मरणीय बनवला. ब्राम्हणवाडा गावात वाढदिवसाचा हा प्रसंग कुटुंबीय, नातेवाईक व मान्यवरांच्या उपस्थितीत अतिशय स्नेहपूर्ण वातावरणात पार पडला.

## नगराध्यक्ष आणि अपक्ष उमेदवारांच्या निर्णयाकडे लक्ष

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

मंचर नगरपंचायत निवडणुकीत माघारीच्या प्रक्रियेला वेग आला असून दोन दिवसांत एकाच उमेदवाराने माघार घेतली आहे. प्रभाग क्र. १५ मधील अपक्ष उमेदवार रूपाली इंद्रजीत दैने यांनी आज माघार घेतली.शुक्रवार दि.२१ रोजी माघारीचा शेवटचा दिवस असल्याने अनेक जणांच्या भूमिकेकडे उत्सुकतेने पाहिले जात आहे. नगराध्यक्षपदासाठी एकूण सहा उमेदवारी अर्ज वैध ठरले असून त्यात दोन महत्त्वाच्या अपक्ष उमेदवारांकडे सर्वांचे लक्ष आहे. शिवसेना महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष जागृती महाजन यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर निर्णय प्रक्रियेत स्वतःला सहभागी न केल्याचा आरोप त्यांनी पक्षावर केला असून अद्याप कोणत्याही नेत्याने आपल्याशी संपर्क साधलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे महाजन या निवडणूक लढण्याच्या भूमिकेवर ठाम आहेत.दरम्यान, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय थोरात यांची स्नूषा प्राची थोरात ह्याही अपक्ष म्हणून नगराध्यक्ष पदाच्या मैदानात आहेत. त्यांनी भाजपाच्या वतीने अर्ज भरला होता.

## अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी हभप दादा मामा नन्नवरे यांची निवड

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील गुरवपिंप्री येथील हभप दादा मामा नन्नवरे यांची अखिल वारकरी सेवा मंडळ, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदी नुकतीच निवड जाहीर करण्यात आली. अखिल वारकरी सेवा मंडळाचे (महाराष्ट्र राज्य) अध्यक्ष हभप बलभीम महाराज पठारे यांनी गुरवपिंप्री येथील ओम शिव मल्हार श्री.संत बाळू मामा देवालय याठिकाणी नुकत्याच झालेल्या सदस्य निवडीच्या कार्यक्रमात त्यांची ही निवड जाहीर केली. तसेच सदस्य म्हणून दादा ढवळे, आबा नन्नवरे, गौतम परहर, मच्छिंद्र लाढाणे, पोपट सुर्यवंशी,



दत्तू लाढाणे, उषा सुर्यवंशी, सरूबाई टकले, संदीप गुंजाळ

अखिल वारकरी सेवा मंडळ, महाराष्ट्र राज्य या संस्थेने माझ्यावर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिल्याने संस्थेच्या 'धर्मो रक्षति रक्षित' या ब्रीदवाक्य नुसार तळागळातील वारकरी सेवेसाठी कटीबद्ध राहून काम करत संस्था बळकटीसाठी प्रामाणिक प्रयत्न करील, असे नूतन जिल्हाध्यक्ष दादा मामा नन्नवरे यांनी सांगितले.

यांची निवड करण्यात आली.

या निवडीच्या कार्यक्रमाप्रसंगी हभप सोमनाथ महाराज गांगर्डे, हभप कृष्णाजी फुंदे महाराज, हभप राणी दिदी बडे महाराज, गुरवपिंप्रीचे माजी सरपंच कोंडीराम खामगळ, डॉ.रामदास टकले, सरपंच सुनिल टकले, पोलिस पाटील बाबासाहेब टकले, जालिंदर मांढरे, प्रकाश जगताप, निलेश सुर्यवंशी, संकेत टकले, जयेश टकले, आशिष टकले आदी उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष दादा मामा नन्नवरे व नूतन सदस्य यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या निवडीबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे वारकरी संप्रदायासह सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## हॉटेल साई सहारा पिंपळवाडी रोड शिर्डी येथील कुंटणखान्यावर गुन्हा दाखल

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

■ ३ पिडीत महिलेची सुटका करुन हॉटेल चालक व मॅनेजर असे २ आरोपी अटक, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर कार्यालयाची कारवाई

दिनांक १९/११/२०२५ रोजी मा.श्री. सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर यांना मिळालेल्या गोपनीय माहिती प्रमाणे हॉटेल साई सहारा पिंपळवाडी रोड शिडी येथे काही इसम महिला करवी कुंटणखाना (वेश्याव्यवसाय) चालवित आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर कार्यालयातील पोलीस अंमलदार पो.हे.कॉ. दादासाहेब लोढे, पो.ना. संदीप दरंदले, पो.कॉ. राजेंद्र बिरदवडे, पो.कॉ. अशोक गाडे, पो.कॉ. सहदेव चव्हाण तसेच शिर्डी पो.स्टे.चे पो.नि. रणजित गलांडे, पो.हे.कॉ. अण्णासाहेब दातीर, पो.हे.कॉ. सुधाकर काळोखे, पो.कॉ. विकी त्रिभुवन, म.पो. कॉ. धनश्री मुंडे यांना सुचना देवुन कारवाई करणेबाबत कळविले वरुन पो.नि. रणजित गलांडे यांनी पो.कॉ. भोसले यांना दोन पंच बोलावुन घेवुन पो.स्टे.ला हजर करणेकामी रवाना केले. त्यानंतर पो. कॉ. भोसले यांनी दोन पंचाना बोलावून शिडी पो.स्टे.ला हजर केले, त्यांना पो.नि. रणजित गलांडे यांनी हॉटेल साई सहारा पिंपळवाडी रोड शिडर्डी येथे काही इसम महिलाकरवी कुंटणखाना (वेश्याव्यवसाय) चालवित असेलबाबत गोपनिय माहिती मिळाली असुन सदर ठिकाणी कारवाई करणे करीता जाणे असलेबाबत कळवुन नमुद पथक बनवुन छापा कारवाई करणेकरीता रवाना झाले. नमुद पथकाने हॉटेल साई सहारा पिंपळवाडी रोड शिर्डी येथे चालणाऱ्या कुंटणखान्याबाबत खात्री करण्याकरीता पो.नि. रणजित गलांडे यांनी पो.कॉ. राजेंद्र बिरदवडे बनावट ग्राहक म्हणुन जाण्याबाबत सुचना देवुन पाठविले. पथकाने नमुद हॉटेलमध्ये वेश्याव्यवसाय चालू असलेबाबत खात्री पटल्यानंतर पंचासमक्ष हॉटेलवर छापा टाकुन हॉटेलमधील इसम नामे १) गणेश सिताराम कानडे वय ४१ वर्ष रा. लक्ष्मीनगर शिर्डी , ता. राहाता, जि. अहिल्यानगर (हॉटेल चालक) २) अमोल भिमा भोसले वय २४ वर्ष रा. श्रीरामनगर शिर्डी ता. राहाता जि. अहिल्यानगर (हॉटेल मॅनेजर) यांना ताब्यात घेऊन पंचासमक्ष हॉटेलची पाहणी करता हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावर ३ महिला मिळून आल्या.

## 'ट्रॉफी टूर'च्या स्वागतासाठी पुणे सज्ज

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एफआयएच पुरुष हॉकी ज्युनियर विश्वचषक २०२५ 'ट्रॉफी टूर' स्वागतासाठी पुणे सज्ज झाले आहे. एफआयएच पुरुष हॉकी ज्युनियर विश्वचषक २०२५ स्पर्धेची ट्रॉफी सध्या देशभरातील प्रमुख २० शहरामध्ये फिरवली जात असून पुण्यात २१ नोव्हेंबर रोजी येत आहे. भारत सलग तिसऱ्यांदा प्रतिष्ठित ज्युनियर विश्वचषक स्पर्धेचे आयोजन करत आहे.२०१६मध्ये लखनौ येथील स्पर्धेत यजमान भारताने विजेतेपद पटकावले होते. २०२१मध्ये भुवनेश्वर येथे अर्जेंटिना संघ विश्वविजेता बनला. भारत चौथ्या स्थानावर राहिला. भारताने २०१३मध्येही नवी दिल्ली येथे या स्पर्धेचे आयोजन केले होते.

यंदा २८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान चेन्नई आणि मदुराई येथे ज्युनियर विश्वचषक स्पर्धा होणार आहे. देशाच्या हॉकी वारशातील तो आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

ज्युनियर विश्वचषक हॉकी स्पर्धेच्या ट्रॉफी टूरचा पुणे १६वा थांबा (स्टॉप) आहे. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या हॉकी इंडिया शताब्दी सोहळ्यादरम्यान ट्रॉफी टूरला सुरुवात झाली.

# अरुण गवळी यांनी स्वयंभू कपर्दीकेश्वराचं घेतले दर्शन

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

अखिल भारतीय सेनेचे अध्यक्ष, भायखळा मतदारसंघाचे माजी आमदार आणि मुंबईतील दगडी चाळ परिसरातून उदयास आलेले अरुण गवळी उर्फ 'डॅडी' यांनी मंगळवारी ओतूर येथील श्री कपर्दीकेश्वराच्या मंदिरात सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. त्यांच्या आगमनाने परिसरात कुतूहलाचे वातावरण निर्माण झाले.



अरुण गवळी हे लहानपणापासून शिवभक्त म्हणून ओळखले जातात. त्यांनी शिवभक्तीची परंपरा आणि देवदर्शनाचा क्रम आजही कायम ठेवला असून त्याच भावनेतून त्यांनी श्रीकपर्दीकेश्वराच दर्शन घेतले.

देवालयात विधिवत पूजा-अर्चा करून त्यांनी कपर्दीकेश्वराचा आशीर्वाद घेतला.

मुंबईतील दगडी चाळ म्हणजे अरुण गवळी यांची ओळख. या भागातून उभारलेली त्यांची सामाजिक आणि नंतर राजकीय ताकद ही मुंबईच्या इतिहासातील एक महत्त्वाची नोंद मानली जाते.

१९९०–२००० या काळात मुंबईतील गुन्हेगारी जगतात त्यांची भूमिका प्रसिद्ध होती. कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित अनेक प्रकरणांत ते चर्चेत राहिले.

२०१२ साली एका सुत्रधाराच्या हत्येच्या प्रकरणात त्यांना न्यायालयाने सजा सुनावली, आणि ते अनेक वर्षे कारावासात होते. त्यांचा गुन्हेगारी जगतातील प्रभाव, त्यांच्या संघटनेची उभारणी आणि त्यानंतरचा राजकीय प्रवास हे महाराष्ट्राच्या नागरी इतिहासातील एक वेगळे प्रकरण मानले जाते.

### संवाद आणि भविष्यातील आश्वासने

या भेटीदरम्यान अरुण गवळी यांनी देवस्थानच्या कारभाराविषयी व सोयी सुविधांविषयी सखोल माहिती घेतली व भविष्यात देवस्थानला सहकार्य करण्याचेही आश्वासन दिले

ओतूर येथे झालेल्या भेटीदरम्यान श्री कपर्दीकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष व पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री. अनिल तांबे यांनी श्री. गवळी यांचा सपत्नीक सत्कार करून देवालयाच्या वतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी देवालयाच्या पुजाऱ्यांनी विधिपूर्वक पूजा केली.

या प्रसंगी श्री. अरुण गवळी, सौ. आशा गवळी, श्री. अनिल तांबे, श्री अनिल डुंबरे गांधी पानसरे जितू अण्णा डुंबरे व देवधर्म संस्थेचे विश्वस्त स्थानिक कार्यकर्ते तसेच राजकीय—सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. गावकऱ्यांमध्येही या भेटीबद्दल मोठे औत्सुक्य दिसून आले.

# ट्विन्स, चढाओढ आणि वाढत्या वयातले वाद

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

शालेय जीवनातील गोंधळ, क्रश आणि संभ्रम पुन्हा अनुभवण्यासाठी आता सज्ज व्हा. ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रिमिंग सेवा-ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने को-एड या आपल्या न्यू कमिंग-ऑफ-एज ड्रामाचे ट्रेलर नुकतेच अनावरीत केले, नंतर बालदिनाला टीजर रिलिज करण्यात आले. फक्त मुले व फक्त मुलींच्या शाळेच्या पार्श्वभूमीवरुन सुरुवात होऊन, पुढे अनेक वर्षांनी त्या वातावरणात गुंगायला होते, नंतर किशोरवयीन जगासोबत सामना झाल्यावर चुकांची मिश्किल




कॉमेडी, वादविवाद, उत्सुकता आणि पहिल्या-वहिल्या प्रेमाची अनुभूती मिळते. गुटर गू सारख्या अतिशय लोकप्रिय सिरीजमागची जोडी, सिख्या एंटरटेन्मेंट आणि निर्देशक साकिब पांडोर आणखी एक वास्तववादी कथा घेऊन आले आहेत ज्यात विनोद, भावनिकता आणि आठवणींचा समावेश होतो. वेदांत सिन्हा, अद्रिजा सिन्हा, वरुण बडोला आणि राजेश्वरी सचदेव यांच्या प्रमुख भूमिका असलेला, सीओ-इडी आपल्या कौटुंबिक कथानकामार्फत तुम्हाला एका हृदयस्पर्शीरोलर कोस्टर सफरीवर घेऊन जाणार आहे. ट्रेलरमध्ये दोन विरुध्द वृत्ती अचाकन समोरासमोर आल्यावर मजेशीरपणे घडणारे प्रसंग दिसतात. शिखा आण निखील पारवानी याहून वेगळे असूच शकत नाहीत. शिखा बेधडक, स्पष्ट बोलणारी आणि बॅक बेंचर आहे, तर याउलट निखील मित्रा, लाजाळू आणि क्लास टॉपर आहे. अनपेक्षितपणे मुलांची आणि मुलींची शाळा एकत्र करण्यात आल्यावर ते गोंधळतात. हास्य, संभ्रम आणि भावनीक क्षणांसोबत व्यक्तीमत्वांमध्ये खटके उडतात आणि मजेशीर चढाओढी होतात. विनोद, नॉस्टाल्जिया आणि भावनांचा सुंदर मिलाफ असलेला को-एड वाढत्या वयातल्या गुंत्याला, जादू आणि वेडेपणाला चपखलपणे आपल्या समोर आणतो. सिरीजबद्दल बोलताना ॲमेझॉन एमएस प्लेअरचे डायरेक्टर आणि हेड ऑफ कंटेंट, अमोघ दुसाद म्हणाले, "दैनंदिन जीवनातल्या बारकाव्यांना दाखवत सर्व वयोगटांमधल्या प्रेक्षकांची नेहमी करमणूक करणे हा ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचा उद्देश आहे. को-एड वाढत्या वयातल्या मुलांची उत्सुकता, संभ्रम आणि धैर्य दाखवणारे हृदयस्पर्शी कथानक आहे-हा जीवनातला असा टप्पा असतो, जिथे खेळकरपणा आणि महत्वाच्या शिकवणी एकत्रितपणे अगदी सहज अनुभवता येतात.



पुणे : लोयोला फुटबॉल कप २०२५ स्पर्धेत तीन विभागांमध्ये जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूलला दुहेरी मुकुट पटकावण्याची संधी आहे. १२ वर्षांखालील गटाच्या उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात अयान सोनिगाराच्या हॅटट्रिकच्या जोरावर द बिशप्स स्कूलने विद्या भवनचा ५-० असा पराभव केला. अयानने (२, १० आणि १९ मिनिटे) गोल हॅटट्रिक विजयाची पायाभरणी केली.

## थोडक्यात बातम्या...

### अष्टविनायक दर्शन यात्रा उत्साहात संपन्न -

वडाळा महादेव (स. गांवकरी) : श्रीरामपुर तालुक्यातील वडाळा महादेव येथील भाविकासाठी आष्टविनायक यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते अष्टविनायक दर्शन यात्रे मध्ये साधारण १२५ भाविक भक्त यांनी सहभाग नोंदवला भाविकांना शुभेच्छा देण्यासाठी अशोक सह. सा. का. संचालक निरज भैय्या मुरकुटे यांची उपस्थिती लाभली लेण्यांद्री येथील गिरजात्मक , ओझर येथील श्री विघ्नहर , महड येथील वरदविनायक , पाली येथील बल्लाळेश्वर , थेऊर चिंतामणी , मोरगाव मोरेश्वर , तसेच सिद्धटेक सिध्दिविनायक आदी गणपतीचे दर्शन घेऊन भाविकांनी समाधान व्यक्त केले यात्रा उत्सवाचे उद्धव आहेर यांनी आयोजन केले यावेळी सौ मनिषाताई भालेराव, माधुरीताई खेले मिनाताई गवळी कल्पनाताई गवळी, नंदाताई राऊत सुमन राऊत मनिषा धुमाळ, अंजली धुमाळ योगिता धुमाळ संगिता पाटिल सुजाता माळी अर्चना राजेभोसले उर्मिला विखे अनिता भवार कविता राऊत, सुरेखा फोफसे सुवर्णा पटारे श्री उत्तमराव डांगे प्रदिप खेले रावसाहेब लिप्टे नाना राऊत हभप भानुदास खरात चांगदेव राऊत पुंडलिक खैरनार भाऊसाहेब भवार राजेंद्र सोनवने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चे वाहक गोरक्षनाथ भालेराव चालक ज्ञानेश्वर पवार .यांनी विशेष परिश्रम घेतले यात्रा आयोजक उध्दव आहेर यांनी सर्व भाविकांचे आभार मानले.

### एण्ड टीव्ही कलाकारांनी प्रवास आणि टेलिव्हिजनच्या भवितव्याबाबत सांगितले!

नवी दिल्ली (स. गांवकरी) : टेलिव्हिजन दशकांपासून भारतीय मनोरंजन क्षेत्राचा पाया राहिले आहे, अनेक कलाकारांच्या करिअरला आकार देत आहे, लोकप्रिय कलाकार घडवत आहे आणि सामायिक कथानकांच्या माध्यमातून लाखो कुटुंबांचे मनोरंजन करत आहे. वर्ल्ड टेलिव्हिजन डे निमित्त एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार पारस अरोरा (जीतू, घरवाली पेडवाली), योगेश त्रिपाठी (हप्पू सिंग, हप्पू की उलटन पलटन) आणि आसिफ शेख (विभुती नारायण मिश्रा, भाबीजी घर पर है) त्यांच्या प्रवासाच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच टेलिव्हिजनने त्यांना ओळख, उद्देश आणि करिअर घडवण्यासाठी मंच दिला, याबाबत सांगत आहेत. आगामी मालिका घरवाली पेडवालीमधील पारस अरोरा ऊर्फ जीतू म्हणाले, मी खूप लहान असताना माझ्यामध्ये टेलिव्हिजनप्रती आवड निर्माण झाली. मी त्यावेळी एका लोकप्रिय मालिकेमध्ये बालकलाकार म्हणून माझ्या करिअरला सुरूवात केली आणि त्या अनुभवाने मी आज जो कोणी आहे ते बनण्यास आकार दिला. टेलिव्हिजनने मला शिस्तबद्धतेची शिकवण दिली, मला ओळख दिली आणि कथानकाचे खरे पैलू समजण्यास मदत केली. मला उत्साहित करणारी बाब म्हणजे मालिका घरवाली पेडवालीचा भाग असणे. खूप वर्षांनंतर नवीन पैलूसह अलौकिक शक्तीसंदर्भातील विनोदी मालिका टेलिव्हिजनवर पाहायला मिळणार आहे.

### संत तेरेजा गर्ल्स हायस्कूल येथे बुद्धीमत्ता चाचणी संपन्न

वडाळा महादेव (स. गांवकरी) : श्रीरामपुर तालुक्यातील हरेगांव येथील संत तेरेजा गर्ल्स हायस्कूल या ठिकाणी इयत्ता १० वीच्या विद्यार्थीनीं करिता व्यवसाय मार्गदर्शन उपक्रमाअंतर्गत बुद्धीमता चाचणी तसेच विवीध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सदर चाचणी मध्ये सुमारे ६४ विद्यार्थीनींनी भाग घेतला सदर चाचणी ही माजी पंतप्रधान श्री पंडीतजी नेहरू यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दि १४/११/२०२५ रोजी घेण्यात आली. यासाठी संगमनेर येथील तज्ञ प्राचार्य श्री सी एम साळवे सर यांच्या मार्गदर्शना खाली घेण्यात आली. यावेळी प्रगत पदवीधर संघटना पुणे चे उपाध्यक्ष श्री फ्रान्सिस बोर्जेस श्री ज्यो दिवे सर श्री विजयराव त्रिभुवन श्री प्रसन्न शेळके सर यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री नरेश चव्हाण हे ही यावेळी उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हायस्कूल च्या प्राचार्य श्रीमती ज्योती गजभीव यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच वर्गशिक्षिका वैशाली सोनवणे यांनी मार्गदर्शन केले प्रगत पदवीधर संघटना पुणे व श्रीरामपूर येथील सदस्यांनी सदर उपक्रमाचे कौतुक केले आहे कार्यक्रम यशस्वी करणेसाठी ॲड प्रमोद सगळगिळे प्रयत्नशील असुन उपस्थित मान्यवरांचे त्यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यावर आमदारांची कथित मारहाण : अकोलेत दोन तास रस्ता रोको, जनक्षोभ उसळला !

- अल्पसंख्याक शेतकऱ्याला मारहाण? – सर्वपक्षीय नेत्यांचा रस्त्यावर धडक निषेध!
- कोल्हार–घोटी मार्ग ठप्प : आमदारांवर फौजदारी कारवाईची नागरिकांची एकमुखी मागणी!
- शेतकऱ्याच्या श्रीमुखात हात – अकोले तालुक्यात हुकूमशाहीविरोधात प्रचंड आंदोलन!

## नेत्यांचे संतप्त भाष्य – लोकशाही व शेतकरी सन्मानाचा प्रश्न!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

शेतकरी वाळीबा होलगीर यांच्यावर आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केलेल्या कथित मारहाणीच्या निषेधार्थ अकोले तालुक्यात आज ऐतिहासिक, अभूतपूर्व व उसळलेल्या जनआक्रोशाने भारलेले दोन तासांचे रस्तारोको आंदोलन छेडण्यात आले.

लिंगदेव ग्रामस्थ, कानडी समाज, विविध सामाजिक संघटना, सर्वपक्षीय नेते आणि मोठ्या संख्येने शेतकरी यांनी एकत्र येत कोल्हार–घोटी राज्य मार्ग ठप्प करून आमदार लहामटे यांनी तात्काळ सार्वजनिकरीत्या माफी मागावी, अन्यथा त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी ठाम मागणी केली.



सकाळी नेमके ११ वाजता शेकडो आंदोलनकर्ते कोल्हार–घोटी रस्त्यावर एकत्र जमले. टायर, बॅनर्स, लाठ्या, ढोल–ताशे, निषेधफलक अशा साधनांनी सज्ज नागरिकांनी रस्ता अडवून धरला.

"शेतकऱ्यावरील अत्याचार बंद करा", "आमदार माफी मागा!", "हुकूमशाही नाही चालणार" या घोषणांनी परिसर दणाणून गेला. महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने आंदोलनाला अधिक जोश प्राप्त झाला.

रस्त्यावर दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा तासभराहून अधिक वेळ अडकून राहिल्या. पोलिसांनी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्याचा प्रयत्न केला, मात्र जमावाच्या प्रचंड संख्येमुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रशासनाला मोठे प्रयत्न करावे लागले. जिल्ह्यातील विविध पक्ष आणि संघटनांची एकजूट – प्रभावी नेतृत्वाच्या



उपस्थितीने तापली परिस्थिती!

आंदोलनासाठी अनेक मान्यवर स्वतः उपस्थित राहिले. त्यात प्रमुख उपस्थिती अशी : बी.जे. देशमुख (सेवानिवृत्त अधिकारी) अमित भांगरे (राष्ट्रवादी काँग्रेस) मारुती मेंगाळ (शिवसेना) बाजीराव दराडे (ओबीसी संघटना) संपत नाईकवाडी (सामाजिक कार्यकर्ता) बाळासाहेब वडजे (भाजप नगराध्यक्ष, अकोले) राहुल देशमुख, चंद्रकांत गोंदके, भानुदास सदगीर, बबन सदगीर, स्वप्नील धांडे, पोपट चौधरी, राहुल बेनके यांच्यासह शेकडो शेतकरी, तरुण व ग्रामस्थ. या विविध पक्षीय एकजुटीमुळे आंदोलनाला अधिक ताकद प्राप्त झाली. राजकीय मतभेद विसरून सर्वांनी शेतकऱ्यांच्या न्यायासाठी एकत्र येऊन आवाज बुलंद केला.

पोलीस व प्रशासनाला निवेदन – आमदारांवर फौजदारी कारवाईची मागणी!

परिसरात तणाव लक्षात घेऊन पोलीस अधिकारी मोहन बोरसे आणि नायब तहसीलदार लोहकरे घटनास्थळी दाखल झाले.

आंदोलनकर्त्यांनी त्यांना निवेदन देत म्हटले : शेतकऱ्यावर हात उगारणारा लोकप्रतिनिधी म्हणून आमदार राहण्यास पात्र नाही. शेतकऱ्याचा आवाज दाबण्याची कृती असह्य आहे. फौजदारी गुन्हा तात्काळ दाखल करण्यात यावा. माफी न मागल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल. प्रशासनाने निवेदन स्वीकृत केले असून पुढील प्रक्रिया सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले.

न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच – आणखी मोठ्या आंदोलनाचा इशारा! आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की : आमदार लहामटे माफी मागेपर्यंत लढा सुरू राहील! आवश्यक असल्यास महामोर्चा, तहसील कार्यालयाला घेराव, मंत्रालयापर्यंत मोठे आंदोलन उभारले जाईल.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी 'शेतकरी संरक्षण समिती' स्थापन करणार असल्याचीही चर्चा पुढे आली समारोपाचे आभार राहुल बेनके यांनी मानले.

ही घटना तालुक्यातील लोकशाही, शेतकरी सन्मान आणि प्रशासनिक जबाबदारी यांच्या केंद्रस्थानी असलेला मोठा प्रश्न उभा करते. आंदोलनाची तीव्रता पाहता पुढील काही दिवसांत राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

"लहान, अल्पसंख्याक समाजातील माणसाने प्रश्न विचारला म्हणून त्याला मारहाण करणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटणे आहे. हा सरळसरळ हुकूमशाहीचा नमुना आहे. माफी मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही."
**- बबन सदगीर (कानडी समाजाचे संघटक)**

"संविधानानुसार जनता प्रश्न विचारते आणि लोकप्रतिनिधी उत्तर देतात. पण इथे प्रश्न विचारण्यापूर्वीच मार दिला जातो. ही घटना लोकशाहीवरील काळा डाग आहे. आता जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय न्याय मिळत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे."
**- बी.जे. देशमुख (सेवानिवृत्त अधिकारी)**

"आमदारांन वरच नव्हे तर अट्रॉसिटीचे खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. समाजात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही." **- बाजीराव दराडे (ओबीसी संघटना)**

"माजी मंत्री पिचड यांनी तालुक्यात चार दशक सत्ता चालवली, पण कधीही टीका करणाऱ्या जनतेवर हात उगारला नाही. तो आदर्श सध्याच्या आमदारांनी घ्यायला हवा होता. गरीब शेतकऱ्याला मारहाण करणे हा अमानवी कृत्य आहे." **- बाळासाहेब वडजे (नगराध्यक्ष)**

"शेती हक्कांसाठी नेहमी आंदोलन करावे लागते. पण महाराष्ट्रात पहिल्यांदाच आमदारांच्या मारहाणीविरोधात शेतकरी रस्त्यावर उतरतोय, ही लाजिरवाणी वेळ आपल्यावर आली आहे. चूक असेल तर सांगणे हीच खरी कार्यकर्त्याची जबाबदारी." **- मारुती मेंगाळ (शिवसेना)**

"कानडी समाज अल्पसंख्याक आहे म्हणून काय? अत्याचाराच्या विरोधात आम्ही भक्कमपणे उभे राहू. बेलापूर, निळवंडे, खडकी, विठा घाट अशा अनेक ठिकाणी अशाच घटना घडत आहेत. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी एकत्र आल्याशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांवरील अत्याचार आता थांबलेच पाहिजेत." **-अमित भांगरे (राष्ट्रवादी काँग्रेस)**

# श्री रत्नसुंदरसूरिश्वरजी महाराज साहेबांच्या ५०० व्या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने भव्य "ऊर्जा महोत्सवा'चे आयोजन

## ग्रंथाचे प्रकाशन भारताचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ जानेवारी २०२६ रोजी होणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

गुजरातची आध्यात्मिक परंपरा आणि भारतीय संस्कृतीचा तेजस्वी वारसा — पद्मभूषण गौरवाने अलंकृत, परम पूज्य आचार्य श्री रत्नसुंदरसूरिश्वरजी महाराज साहेबांच्या ५०० व्या ग्रंथ "प्रेमनु विश्व, विश्वनो प्रेम" (मराठीत अर्थ – "प्रेमाचे विश्व, विश्वाचे प्रेम") च्या प्रकाशनाच्या निमित्ताने एक भव्य "ऊर्जा महोत्सव" आयोजित करण्यात आला आहे.

हा सहा दिवसांचा महोत्सव ७ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान रिचर्ड्स अँड क्रुड्डास जम्बो फॅसिलिटी सेंटर, मुलुंड, मुंबई येथे होणार आहे.या ऐतिहासिक सोहळ्याचे वैशिष्ट्य असे आहे की, या ग्रंथाचे प्रकाशन भारताचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.

जगप्रसिद्ध प्रवचनकार आणि युवा परिवर्तनाचे प्रेरणास्थान

वर्धमान तपोनिधी, परम पूज्य गुरुदेव श्री भुवनभानुसूरिश्वरजी महाराज साहेबांच्या आशीर्वादाने



आचार्यश्री गेल्या ५० वर्षांहून अधिक काळापासून आपल्या प्रवचनांच्या माध्यमातून समाजाला जागृत करत आहेत. ते एक प्रभावशाली आणि जगप्रसिद्ध वक्ते आहेत, ज्यांच्या विचारांनी लाखो युवकांच्या जीवनात परिवर्तन घडवले आहे.

त्यांच्या प्रेरणेतून अनेक तरुणांनी नैतिकता, संस्कार आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारली असून, व्यसनमुक्त आणि आशावादी जीवन जगण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

आचार्यश्रींनी फक्त प्रवचनांनीच नव्हे तर लेखनाद्वारेही समाजाला मार्गदर्शन केले आहे.फॅमिली, स्ट्रेस मॅनेजमेंट, पॉझिटिव्हिटी, आणि ह्युमॅनिटी अशा ८० पेक्षा अधिक संवेदनशील विषयांवर त्यांनी गुजराती भाषेत ५०० पुस्तके लिहून एक अप्रतिम कीर्तिमान प्रस्थापित केले आहे.या अद्वितीय साहित्यिक योगदानासाठी त्यांना दोन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मिळाले आहेत.त्यांचा स्पष्ट संदेश आहे राष्ट्राचे नैतिक मूल्ये आणि सांस्कृतिक एकतेच्या बंधनाने पुनरुत्थान करणे, जो ते आपल्या प्रवचनांद्वारे आणि लेखनातून संपूर्ण राष्ट्राला देत आहेत.

# पोषण न गमावता व्हेगन बनण्यासाठीची स्मार्ट मार्गदर्शिका– ऋतिका समद्दार

समद्दार यांच्या मार्गदर्शनात हळूहळू बदल स्वीकारणे, गरज भासल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि आहारात विविधतेने भरलेले अन्नपदार्थ समाविष्ट करणे यावर भर दिला आहे. या पद्धतीमुळे व्हीगन आहार पौष्टिक, संतुलित आणि समाधान देणारा ठरू शकतो. दररोजच्या आहारात बदामांचा समावेश केल्यास तो एक सोपा आणि उपयुक्त पोषणपूरक पर्याय ठरतो.

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

व्हेगन जीवनशैलीकडे वळणे हे उत्तम आरोग्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि करुणेकडे जाणारे प्रभावी पाऊल मानले जाते. जरी अनेकांची धारणा असते की व्हेगन आहारात महत्त्वपूर्ण पोषकतत्त्वांची उणीव भासू शकते, तरीही सुयोग्य नियोजनामुळे हा आहार पूर्णपणे संतुलित आणि पोषक बनू शकतो. व्हेगन आहाराचा अर्थ फक्त प्राणिजन्य पदार्थांचा त्याग नसून, विविध वनस्पती-आधारित पदार्थांनी सजलेली समृद्ध थाळी तयार करणे हा आहे. यासंदर्भात, दिल्लीतील मॅक्स हेल्थकेअरच्या रीजनल हेड ऑफ डायटेटिक्स, ऋतिका समद्दार यांनी व्हेगन



आहार स्वीकारू इच्छिणाऱ्यांसाठी काही उपयुक्त टिप्स आणि मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

दिल्लीतील मॅक्स हेल्थकेअरच्या रीजिअनल हेड ऑफ डायटेटिक्स, ऋतिका समद्दार यांच्या मते, आरोग्यदायी व्हेगन आहाराची पायाभरणी ही संपूर्ण, कमीतकमी प्रक्रिया केलेल्या पदार्थांवर आधारित असावी. त्या सुचवतात की आपल्या ताटातील अर्धा भाग रंगीबेरंगी फळे आणि विविध भाज्यांनी भरावा, ¼ भाग कडधान्यांसारख्या आरोग्यदायी प्रथिनांनी आणि उर्वरित ¼ भाग ब्राउन राईस, गहू, बाजरी यांसारख्या संपूर्ण धान्यांनी भरावा. यासोबतच बदामांसारखे आरोग्यदायी फॅट्स—विशेषतः कॅलिफोर्निया बदाम—जोडल्यास आहार अधिक संतुलित बनतो. हे बदाम प्रथिन, आहारातील तंतू आणि व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, फायबर आणि पोटॅशियमसह 15 आवश्यक पोषकतत्त्वांनी समृद्ध असतात. दिवसाची सुरुवात एका मूठ कॅलिफोर्निया बदामांसह केल्यास दिवसाचा आरोग्यदायी सूर लागतो.

संपूर्ण अन्नपदार्थ आणि रंगीबेरंगी वनस्पती-आधारित घटकांची ताकद

प्रथिनांची दैनंदिन गरज पूर्ण करण्यासाठी दिवसभरात डाळी, कडधान्ये, सुकामेवा आणि बिया अशा विविध वनस्पती-आधारित स्रोतांचे संयोजन केल्यास स्नायूंच्या पुनर्बांधणीसाठी व कार्यक्षमतेसाठी आवश्यक सर्व अमिनो आम्ले मिळतात. संतुलित व्हेगन आहारात पालकासारख्या पालेभाज्या (कॅल्शियम व लोहासाठी), तसेच लाल व केशरी भाज्या (अँटिऑक्सिडंट्ससाठी) असणे महत्त्वाचे आहे. ऊर्जा देणारी संपूर्ण धान्ये आणि पोषक तत्त्वांची पूर्तता करणारे बदाम यांचा समावेश आहार अधिक सर्वसमावेशक बनवतो.

बदाम—उत्तम प्रोटीन बूस्टर

प्रति १०० ग्रॅममध्ये १८.४ ग्रॅम प्रोटीन देणारे बदाम दैनंदिन प्रोटीनच्या सुमारे ३०% गरजा पूर्ण करतात. याशिवाय, त्यातील आहारातील तंतू रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि दीर्घकाळ पोटभरणाची भावना टिकवून ठेवण्यास मदत करतात, ज्यामुळे वजन व्यवस्थापनासाठी ते अत्यंत उपयुक्त ठरतात. भारतीय मसाल्यांसह फ्लेव्हर केलेले, सॅलडमध्ये मिसळलेले, डेझर्टवर टॉपिंग म्हणून वापरलेले किंवा तसेच खाल्लेले—बदामांचा उपयोग विविध प्रकारे करता येतो. दररोजची एक मूठभर मात्रा प्रोटीनची गरज पूर्ण करण्याचा सोपा आणि स्वादिष्ट मार्ग प्रदान करते.

ओमेगा-३ आणि कॅल्शियम

रितिका आरोग्यदायी चरबीयुक्त पदार्थांच्या सेवनावरही भर देतात. अवोकॅडो, बिया आणि ऑलिव्ह तेल यांसारख्या स्रोतांमधून मिळणारी आरोग्यदायी फॅट्स शरीराला हृदय व मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले ओमेगा-३ प्रदान करतात. याशिवाय, कॅल्शियम समृद्ध वनस्पती-आधारित फोर्टिफाईड दूध—जसे की बदाम दूध, सोया दूध—तसेच टोफू आणि ब्रोकोली यांचा आहारात समावेश केल्याने मजबूत हाडे आणि दात राखण्यासाठी आवश्यक कॅल्शियमची गरज पूर्ण होऊ शकते.

शाकाहारींसाठी आवश्यक पोषक घटक: कॅल्शियम, लोह, बी१२ आणि बरेच काही

समद्दार यांचा आग्रह आहे की व्हीगन पद्धतीत कडक कच्चा आहार किंवा तेलरहित आहार यांसारख्या टोकाच्या पद्धतींपेक्षा टिकाऊ तसेच आनंददायी आहारशैलीला प्राधान्य दिले पाहिजे. त्या व्हिटॅमिन बी12, व्हिटॅमिन डी, लोह आणि कॅल्शियम या महत्त्वपूर्ण पोषकद्रव्यांच्या पूर्ततेकडे लक्ष देण्याचे महत्त्व अधोरेखित करतात.

त्यासाठी फोर्टिफाइड सीरिअल्स, न्यूट्रिशनल यीस्ट यांसारख्या अन्नपदार्थांचा किंवा गरज असल्यास पूरक आहाराचा वापर करावा. लोहयुक्त अन्न व्हिटॅमिन-सी समृद्ध पदार्थांसोबत घेतल्यास शोषणाची कार्यक्षमता वाढते.

# ऑटोमेक (इंडिया) लि. कंपनीच्या पुढाकाराने कुरवंडी गाव होणार स्मार्ट व्हिलेज



मंचर: (समर्थ गांवकरी)

"ऑटोमेक (इंडिया) लिमिटेड कंपनीच्या पुढाकाराने आदर्शगाव कुरवंडी (ता.आंबेगाव) गाव जलसंपन्न व प्रगत होईल.एक हेक्टर क्षेत्रात फळबाग व प्रत्येक कुटुंबाला कोलंबस जातीच्या नारळाचे झाड भेट दिले जाणार आहे. मंचर येथे ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेने तयार केलेल्या आराखड्यानुसार अनेक कामे होणार आहेत. यामुळे गावाच्या सर्वांगीण विकासात भर पडून स्मार्ट व्हिलेज होण्यासाठी मदत होईल तसेच कुटुंबांचा आर्थिकस्थर उंचावेल." असे मत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

आदर्शगाव कुरवंडी ग्रामपंचायतीसमोर विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील व ऑटोमेक (इंडिया) लिमिटेडचे कार्यकारी संचालक अतिन अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. ऑटोमेक (इंडिया) लि. कंपनीच्या पुढाकाराने कुरवंडी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सीएसआर निधीतून राबवला जात आहे.कार्यक्रमाला गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, अजित गटे, उद्योजक अमोल बेंगडे, मनिषा तोत्रे,विकास बारवे,जयराम तोत्रे,कैलास तोत्रे, ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेच्या मुख्य कार्यकारी गार्गी काळे-पाटील, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी कांताराम भोंडवे, ग्रामपंचायत अधिकारी अशोक शेवाळे यांच्यासह जलसंधारण खात्याचे अधिकारी,महिला उपस्थित होत्या.बंधाऱ्याच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल रोहिदास तोत्रे, महेश तोत्रे, दत्तात्रय तोत्रे, विलास तोत्रे, बाळासाहेब तोत्रे आणि नामदेव तोत्रे यांचा सत्कार करण्यात आला.अतिन अग्रवाल यांनी सांगितले की,माजी गृहमंत्री वळसे पाटील व आढळराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कुरवंडी गाव स्मार्ट व्हीलेज करू, ऑटोमेक कंपनीच्या माध्यमातून या भागातील शेतकरी व ग्रामस्थांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल. वेळेश्वर डोंगर परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने कामे हाती घेतली जातील."म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, रविंद्र तोत्रे, सुनिल तोत्रे, नितीन तोत्रे यांची मनोगते झाली. रोहित थोरात, अनुराग गायकवाड, रोहिणी पिंगळे, ओंकार मिंडे व ग्रामस्थांनी व्यवस्था पाहिली.



मंचर : अवसरी खुर्द (कौलीमळा) ता.आंबेगाव येथील रविंद्र वाळके यांच्या घराच्या जवळ तीन बिबटे फिरताना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले होते.बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाने गुरुवार दि.२० रोजी पिंजरा लावला. मंगळवार दि.१८ रोजी पहाटे तीन वाजता तीन बिबटे आढळले होते.त्यामुळे परिसरातील नागरिकांनी पिंजरा लावण्याची मागणी केली होती.त्या मागणी नुसार मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली बेस कॅम्प गावडेवाडी शीघ्र कृती दल, एस के ढोले, आणि ग्रामस्थांच्या मदतीने पिंजरा लावला.

## थोडक्यात बातम्या...

### माजी उपनगराध्यक्ष दिपेशसिंह परदेशी यांचा पदाचा राजीनामा - शिवसेनेत फूट



शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष दिपेशसिंह परदेशी यांनी आपल्या जुन्नर शहर शिवसेना समन्वयक व सदस्य पदाचा राजीनामा जुन्नर तालुका प्रमुख योगेश पाटे यांच्याकडे दिला. परदेशी हे २०१६ साली झालेल्या जुन्नर नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ७ मधून शिवसेना पक्षाकडून निवडून आले होते. त्या नंतर त्यांनी नगरपरिषदेत गट नेता , पाणी सभापती , उपनगराध्यक्ष अशी पदे भूषवित प्रभाग आणि शहराच्या विकासाच्यादृष्टीने अनेक विकास कामे केली. शिवसेनेत झालेल्या दुफळी नंतर परदेशी यांनी आमदार शरद सोनवणे यांची साथ देत त्यांच्या सोबत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत काम केले . नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार शरद सोनवणे हे अपक्ष निवडणूक लढले तरी दिपेशसिंह परदेशी यांनी त्यांची साथ सोडली नाही . विधानसभा निवडणुकीत शहरातून जवळपास पाच हजार मतांचे लीड मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला असे २०२५ च्या या जुन्नर नगरपरिषद निवडणुकीत आमदार शरद सोनवणे यांनी विश्वासात न घेता प्रक्रियेतून लांब ठेवल्याने स्वाभिमान दूखावल्याने त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक ८ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी कोणत्याही नेत्यावर टीका टिपणी न करता आपल्या समन्वयक पदाचा आणि शिवसेना सदस्य पदाचा राजीनामा तालुका प्रमुख योगेश (बाबू) पाटे यांच्याकडे सुपुर्द केला आहे.

### मंचर निवडणुकीत बंडखोरांचा भाव वाढला; नेत्यांची धावपळ सुरू

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीत राजकीय रंगत चांगलीच वाढली आहे. अनेक इच्छुकांनी अपक्ष म्हणून किंवा प्रतिस्पर्धी पक्षात जाऊन उमेदवारी अर्ज भरत पक्षश्रेष्ठींनाच मोठा धक्का दिला आहे. अनपेक्षितरीत्या वाढलेल्या बंडखोरीमुळे पक्षांच्या रणनीतीत गोंधळ निर्माण झाला असून, या नाराज कार्यकर्त्यांना पुन्हा गाठीशी बांधण्यासाठी नेत्यांची चांगलीच धावपळ सुरू झाली आहे. बंडखोर उमेदवारांना पटवण्याचे प्रयत्न वाढल्याने त्यांचाही भाव चढू लागला आहे. काहीजणांना पक्षांतर्गत मोठ्या आश्वासनांची रीघ लागली असून, बंडखोरांना आपलेसे करण्यासाठी नेते व्यक्तिगत भेटी, चर्चा, मध्यस्थी अशा विविध उपाययोजना करत आहेत. उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिवस शुक्रवार दि.२१ रोजी असल्याने सर्वच पक्षांना निवडणूक समीकरणे सांभाळणे आणि बंडखोरांना परत आणणे ही मोठी कसरत बनली आहे.राजकीय हालचालींनी संपूर्ण तालुक्याचे लक्ष मंचरकडे लागले असून, प्रभागनिहाय पेच अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बंडखोर शांत होणार की आपल्याच उमेदवारीवर ठाम राहणार, यावर निवडणूक राजकारणाचा पुढील प्रवास अवलंबून राहणार आहे.

### उमेदवारी माघारीचा अंतिम दिवस जवळ; दबावतंत्रामुळे मंचरचे राजकारण तापले

मंचर (स. गांवकरी) : मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीत उमेदवारी माघारीची अंतिम मुदत शुक्रवार दि. 21 रोजी येत असल्याने संपूर्ण राजकीय वातावरणात तणाव वाढू लागला आहे. अनेक प्रभागांत तिढा निर्माण होऊ नये म्हणून पक्षांतर्गत चर्चांचे फेरे सुरू आहेत. काही ठिकाणी उमेदवारांना स्वयंस्फूर्तीने माघार घेण्याचे आवाहन केले जात असताना, काही ठिकाणी मात्र ही प्रक्रिया दबावतंत्रामुळे पूर्णपणे वेगळ्याच रंगात चालू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. काही उमेदवार किंवा त्यांच्या समर्थकांकडून प्रतिस्पर्धी उमेदवारांवर "तू माघार घे, नाहीतर तुला पाहून घेऊ" अशा दबावयुक्त धमक्या दिल्याची चर्चा जोरात आहे. या दमबाजीमुळे स्थानिक पातळीवर तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, मतदारही या घडामोडींकडे चिंतेने पाहत आहेत. माघारीसाठी केलेल्या राजकीय दबावामुळे गावागावात कुजबुज वाढली आहे.पक्षांतील नेतेही बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. काही प्रभागांत गट–तटांच्या भांडणांनी तापलेली परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत असल्याने नेत्यांची धावपळ वाढली आहे. कोण माघार घेणार आणि कोण शेवटपर्यंत उभा राहणार, यावर अनेक प्रभागांचे राजकीय गणित अवलंबून आहे.एकूणच, उमेदवारी माघारीच्या अंतिम दिवसाच्या आगमनाने मंचरची निवडणूक तापली असून, दमबाजी आणि तणावाने मतदानापूर्वीच वातावरण तापून गेले आहे.

### रोटरी क्लब पुणे यांच्या माध्यमातून चिल्हेवाडीत साहित्याचे वाटप

शिवनेरी (स. गांवकरी) :जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांच्या विशेष प्रयत्नातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत रोटरी क्लब पुणे यांच्या माध्यमातून आदिवासी दुर्गम भागातील चिल्हेवाडी गावात घरकुलाच्या लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. सहा लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये किमतीचे साहित्य देण्यात आले. या साहित्यामध्ये पत्रे, बॉक्स पाईप व सी अॅंगल यांचा समावेश होता. या कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील अधिकारी- पदाधिकारी उपस्थित होते. उपसरपंच नितीन भोईर यांनी ग्रामस्थांना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती दिली. सरपंच अनुसया भोईर यांनी ग्रामविकास अधिकारी मीरा ठाकर, गावाला वेगवेगळ्या माध्यमातून सहकार्य करणाऱ्या सर्व क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी सामाजिक संघटना, संस्था यांचे आभार मानले. सूत्रसंचालन गणेश भोईर व विशेष सहकार्य संजय ठोंगिरे, विनोद भोईर, राजेंद्र महादू भोईर, राजेंद्र भोईर पोलीस पाटील दामोदर बुळे व इतर ग्रामस्थांनी केले.

# रुबी हॉल क्लिनिकचा इमोहा एल्डरकेअर सोबत करार : ज्येष्ठ नागरिकांसाठी महत्वाचे पाऊल




पुणे : (समर्थ गांवकरी)

पुण्यातील सर्वात विश्वासार्ह आरोग्यसेवा संस्थांपैकी एक असलेल्या रुबी हॉल क्लिनिकने इमोहा एल्डरकेअर सोबत एका ऐतिहासिक सहयोगाची घोषणा केली. ही धोरणात्मक भागीदारी शहरासाठी एक संरचित, करुणामयी आणि वैद्यकीयदृष्ट्या देखरेखीखाली ज्येष्ठांसाठी देखभाल परिसंस्था तयार करण्याचे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या स्वास्थ्य पुनर्प्राप्तीच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर पाठिंबा देण्यासाठी रचना केलेला हा उपक्रम रूग्णालयातून घराकडचा प्रवास अधिक सुलभ करत अखंड वैद्यकीय देखरेख, वैयक्तिक निगा आणि भावनिक संबंध प्रस्थापित करणारा ठरेल.

या कार्यक्रमाला डॉ. विराज राव कोरे आणि डॉ. प्राची साठे यांच्यासह प्रख्यात आरोग्य चिकित्सक उपस्थित होते, तसेच रुबी हॉल क्लिनिकचे फिजिशियन आणि विश्वस्त डॉ. सायमन ग्रँट, रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी बेहराम खोदाईजी आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा उपक्रमांच्या महत्त्वावर भर दिला.

जागतिकीकरणाच्या काळात अधिकाधिक भारतीय कुटुंबे आंतरराष्ट्रीय संधींचा शोध घेत असताना, स्वतंत्रपणे घरी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीय वाढली आहे. या बदलामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय कौशल्य आणि दैनंदिन मदत एकत्रित पुरवणाऱ्या विश्वसनीय सेवांची गरज वाढली आहे. विश्वासार्ह प्रणालींशिवाय, वृद्धांना अनेकदा वैद्यकीयदृष्ट्या तातडीच्या स्थितीत उशिरा प्रतिसाद, अनियंत्रित दीर्घकालीन आजार, पडझड, औषधांचे चुकीचे व्यवस्थापन, संज्ञानात्मक आव्हाने, एकाकीपणामुळे उद्भवणारे नैराश्य आणि नियमित देखरेखीचा अभाव यासारख्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. ही गरज ओळखून, रुबी हॉल क्लिनिक आणि इमोहा या संस्था एक सुरक्षित, विश्वासार्ह आणि सर्वंकष सेवा देण्यासाठी एकत्र आल्या आहेत. या उपक्रमाद्वारे परदेशात राहणाऱ्या कुटुंबांच्या भारतात राहणाऱ्या पालकांची सखोल काळजी घेतली जाते. संरचित आरोग्यसेवा , प्रशिक्षित परिचारक, पुनर्वसनासाठी मदत, पाठपुरावा आणि भावनिक सहवासाद्वारे मनःशांती मिळेल या दृष्टीने ही भागीदारी परदेशात राहणाऱ्या मुलांना पुण्यातील त्यांच्या पालकांसाठी सेवा प्रदान करेल.

हा सहयोग म्हणजे ज्येष्ठांच्या सुरक्षेची फेरमांडणी करण्याच्या दृष्टीने एक प्रगतीशील पाऊल आहे. रुबी हॉल क्लिनिकची दशकांपासूनची वैद्यकीय उत्कृष्टता आणि ज्येष्ठांच्या देखभालीमध्ये कौशल्य असलेले इमोहा एकत्र आल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या आरोग्य आणि जीवनशैलीच्या विशिष्ट गरजांनुसार तयार केलेल्या मजबूत सेवा प्रणाली उपलब्ध होतील. हा उपक्रम ज्येष्ठांना निरोगी, सामाजिकदृष्ट्या जोडलेले आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध ठेवण्याच्या दिशेने इमोह ॲपद्वारे अखंड वैद्यकीय देखरेख आणि सक्रिय आरोग्य मूल्यांकनांपासून पुनर्वसन, दैनंदिन मदत आणि समुदाय सहभागापर्यंत सेवा प्रदान करेल. हे हॉस्पिटल-टू-होम केअर मॉडेल केवळ पुन्हा आजारी पडण्याचा आणि पुन्हा रुग्णालयात दाखल होण्याचा धोका कमी करत नाही तर स्वास्थ्य पुनर्प्राप्ती परिणाम, आत्मविश्वास आणि एकूणच जीवनाची गुणवत्ता देखील वाढवते. पुण्यातील ज्येष्ठांची संख्या वाढत असताना हा उपक्रम करुणामयी व भविष्यसज्ज आरोग्यसेवेसाठी एक नवीन मापदंड स्थापित करतो.

# शालेय अभ्यासक्रमात वाणिज्य विषयाच्या समावेशासाठी प्रयत्नशील




- सीए केतन सैय्या यांची माहिती
- 'आयसीएआय' कडून सीएच्या विद्यार्थ्यांसाठी ५०० कोटींच्या शिष्यवृत्तीची तरतूद

पुणे: (समर्थ गांवकरी)

वाणिज्य विद्याशाखेमध्ये करिअरच्या उत्तम संधी आहेत. पाचवी ते दहावीच्या अभ्यासक्रमात वाणिज्य विषयाचा समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. यासंदर्भात शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, शिक्षण सचिव आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांची भेट घेतली असून, त्यांनी वाणिज्य विषयाच्या समावेशाबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे, अशी माहिती दी इन्स्टिट्यूट आफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे (डब्ल्यूआयआरसी) अध्यक्ष सीए केतन सैय्या यांनी बुधवारी दिली. सीए अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तब्बल ५०० कोटी रुपयांच्या शिष्यवृत्तीची तरतूद करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. 'डब्ल्यूआयआरसी' च्या उच्चपदस्थ अधिकारी शिष्टमंडळाने बुधवारी पुण्यातील विविध संस्थांना भेटी देऊन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर 'आयसीएआय' च्या बिबवेवाडी येथील पुणे शाखेत संस्थेच्या वतीने सीए सभासद व विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी कौन्सिलचे उपाध्यक्ष सीए पियुष चांडक, सचिव सीए जीनल सावला, खजिनदार सीए फेनील शहा, पुणे शाखेचे अध्यक्ष सीए सचिन मिणियार, विभागीय समितीचे सदस्य सीए अभिषेक धामणे, सीए रेखा धामणकर, सीए राजेश आगरवाल यांच्यासह 'आयसीएआय' पुणेचे उपाध्यक्ष सीए प्रणव आपटे, सीए निलेश येवलेकर, खजिनदार सीए नेहा फडके, कार्यकारिणी सदस्य सीए सारिका दिंडोकर, सीए नंदकुमार कदम, सीए प्रितेश मुनोत आदी उपस्थित होते. सीए केतन सैय्या म्हणाले, "शालेय पाठ्यपुस्तकात वाणिज्य विषयाला समर्पित पाठ समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी 'आयसीएआय' तर्फे राज्याच्या शिक्षण विभागाकडे करण्यात आली आहे. या मागणीला शिक्षणमंत्र्यांसह संबंधित उच्चपदस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अभ्यासक्रम तयार करण्यासाठी तज्ज्ञ सनदी लेखापालांची समिती करण्याच्या सूचना मिळाल्या आहेत. त्यामुळे नवीन अभ्यासक्रमात वाणिज्य विषयाचा अभ्यासक्रम समाविष्ट होण्याबाबत स्पष्टता आली आहे." सीए करू इच्छिणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी संस्थेने ५०० कोटी रुपयांच्या शिष्यवृत्तीची तरतूद केली असल्याचे सांगून सीए केतन सैय्या म्हणाले, "ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ५ लाखांच्या आत आहे, अशा विद्यार्थ्यांना कुठल्याही अटी, शर्तींशिवाय शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष व्यावसायिक गरजा, यांच्यात नेमका मेळ घालण्यासाठी विशेष अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोजित केले जातात. सतत बदलणारे तंत्रज्ञान आणि वाढती स्पर्धा, ही दोन प्रमुख आव्हाने सीए व्यावसायिकांसमोर आहेत, मात्र मागणी अधिक पण पुरवठा कमी, अशी परिस्थिती असल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सीए अभ्यासक्रमाची निवड उच्च शिक्षणासाठी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# पेठ येथील दोन दुकानांमध्ये अज्ञात चोरट्यांची चोरी

## एक लाख वीस हजार रुपयांचा ऐवज चोरीला



मंचर : (समर्थ गांवकरी)

पेठ ता.आंबेगाव येथील पेठ कुरवंडी रस्त्यावर दोन दुकानांमध्ये गुरुवार दि.२० रोजी पहाटे दोन अज्ञात चोरट्यांनी चोरी करून जवळपास एक लाख वीस हजार रुपयांचा ऐवज आणि रोकड चोरून नेल्यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे. तसेच कपाटांचेही नुकसान केले आहे. मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.

पेठ–कुरवंडी रस्त्यावर असलेल्या सह्याद्री कृषी सेवा केंद्र व बिग्रेशन मार्ट या दोन दुकानांचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. सह्याद्री कृषी सेवा केंद्रात किरण कुदळे यांच्या दुकानातील कपाट तोडून चोरट्यांनी जवळपास ₹70 हजार रुपयांची रोख रक्कम लंपास केली. तसेच कपाटाचे जवळपास ₹30,000 इतके नुकसान झाले आहे. दुकानातील काही साहित्याचे नुकसान झाले. शेजारच्या बिग्रेशन मार्ट या किराणा दुकानात चोरट्यांनी हात साफ केला.दिवाळीनिमित्त ग्राहकांना वाटण्यासाठी ठेवलेली एक तोळा वजनाची चांदीची आठ नाणी, तसेच काजू–बदाम यांची पॅकेट्स, दुकानात असलेल्या २४ कॉपर प्लेट, ५० मीटर केबल असे सुमारे ₹50 हजार रुपयांच्या किमतीचे साहित्य चोरांनी चोरून नेले. अशी माहिती दुकानाचे मालक विकास गटे यांनी दिली.सध्या थंडीचा मोसम सुरू असल्याने गावात लवकर शांतता पसरते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेवून ही चोरी केली असावी, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे. अशा सततच्या चोरीच्या घटना स्थानिक तरुण उद्योजकांच्या मानसिक खच्चीकरणाला कारणीभूत ठरत असल्याचेही सरपंच संजय पवळे आणि ग्रामस्थांनी सांगितले.सीसीटीव्ही कॅमेराचे डिव्हायडर चोरट्याने चोरून नेला.चोरीच्या घटनेची माहिती मिळताच माजी सरपंच रामशेठ तोडकर,शरद सहकारी बँकेचे संचालक संतोष धुमाळ यांच्या सह इतरांनी भेट देऊन पाहणी केली. मंचर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

दोन्ही दुकानांतून झालेल्या चोरीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.या दुहेरी चोरीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी गस्त वाढवावी. चोरट्यांचा लवकरच शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटीने भारताच्या पुरातन ज्ञानाला दिली नवसंजीवनी




पुणे : (समर्थ गांवकरी)

सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटी (एसव्हीयू) सातत्याने इंडियन नॉलेज सिस्टम्स म्हणजेच भारतीय ज्ञान प्रणालींवर विशेष भर देत भारतातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देत आहे. क. जे सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ धर्म स्टडीजअंतर्गत या विद्यापीठातर्फे योगशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्वशास्त्र, प्राचीन भाषा आणि साहित्य आणि धर्मविषयक अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. २१ व्या शतकातील बौद्धिक ज्ञानाची आस पूर्ण करतानाच भारताच्या प्राचीन ज्ञान पद्धतींची मुळे जपणारा सर्वसमावेशक अभ्यासक्रम यातून तयार झाला आहे. भारतीय ज्ञान प्रणालीतील संशोधन आणि शिक्षक प्रशिक्षण मंत्रालयाने प्रमाणित केलेले हे विद्यापीठ भारतातील काही निवडक केंद्रापैकी एक आहे जिथे संस्कृत, पाली, प्राकृत, हिंदू धर्म, जैन धर्म आणि बौद्ध धर्माच्या अभ्यासाला समकालीन संशोधन पद्धतींची जोड देण्यात आली आहे. तत्त्वज्ञान, पुरातत्त्वशास्त्र, भाषाशास्त्र, आरोग्य विज्ञान आणि सांस्कृतिक इतिहास अशा विविध क्षेत्रातील दृष्टिकोन यात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संकल्पनांचे मूळ अभ्यासता येते आणि त्याचवेळी भारतीय आणि जागतिक विचारप्रणाली घडवणाऱ्या पद्धती समजून घेता येतात. योगशास्त्र अभ्यासक्रमात ही पद्धती अधिक व्यापक स्वरुपात दिसून येते ज्यात योग तत्त्वज्ञानासोबतच मानसिक आणि शारीरिक आरोग्य,सर्वांगीण विकास या बरोबरीनेच आधुनिक मानसशास्त्र, शरीरविज्ञानशास्त्र इत्यादींची जोड दिली जाते. उपनिषदे, योगसूत्रे, हठप्रदीपिका इत्यादी पारंपरिक साहित्यासोबतच यात आधुनिक उपचारात्मक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनही समजावला जातो. प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र या अभ्यासक्रमात भारताच्या मूर्त वारशाचा अभ्यास केला जातो. पुरातत्त्वशास्त्राशी संबंधित प्रत्यक्ष भेटी, संग्रहालयांतील इंटर्नशीप तसेच अजिंठा-वेरुळ, कान्हेरी आणि चौल येथील अभ्यास सहली अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेत येतो. पुरातन भाषा आणि साहित्य अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना संस्कृत, पाली, प्राकृत आणि तिबेटी भाषांच्या प्रशिक्षणासह व्याकरण, भाषिक परंपरा आणि हस्तलिखिते यांचा सखोल अभ्यास शिकवला जातो. या संस्थेत सन्माननीय दलाई लामा चेअर फॉर नालंदा स्टडीज आहे. या उपक्रमासाठी दलाई लामा यांनी त्यांच्या नोबेल पारितोषिकाच्या रकमेतील काही भाग गुंतवला आहे. यातून बौद्ध तत्वज्ञान आणि आंतरधर्मीय संवादासाठीची शिष्यवृत्ती दिली जाते. गोदरेज आर्काइव्ह्ज, कैवल्यधाम योग इन्स्टिट्यट आणि डिपार्टमेंट ऑफ हेरिटेज, तेलंगणा यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना डाक्युमेंटेशन प्रोजेक्ट, संशोधनाशी संबंधित परिषदा आणि सांस्कृतिक देवघेवीस चालना देणा-या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. "प्राचीन भारतीय ज्ञानशाखा म्हणजे भूतकाळाचे अवशेष नाहीत, तर जिज्ञासा, मूल्ये आणि सर्वांगीण विकासाचे जागृत प्रवाह आहेत", असे धर्मशाखेचे अधिष्ठाता डॉ. अभिषेक घोष म्हणाले. "या ज्ञानाची समीक्षात्मक चिकित्सा करण्यासाठी आणि या शाखांची आधुनिक विज्ञान, जागतिक शिक्षण आणि शाश्वत विकास यांच्याशी सांगड घालण्यासाठी विद्वानांना प्रशिक्षित करणे हे आमचे ध्येय आहे", असेही ते म्हणाले. ४० हून अधिक शैक्षणिक अभ्यासक्रम, २० बहुविभागीय मायनर्स प्रोग्रॅम तसेच इजिप्त, ऑस्ट्रिया, मेक्सिको, युके अशा देशांमधील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसह या संस्थेत जागतिक शिक्षण आणि सांस्कृतिक संवादासाठी सुयोग्य परिसंस्था निर्माण करण्यात आली आहे. संशोधनासाठीचे मार्गदर्शन, प्रत्यक्ष स्थळी जाऊन शिक्षण घेणे तसेच जेतवन कम्युनिटी प्रोजेक्ट आणि जश्न-ए-इतिहास हा सांस्कृतिक कार्यक्रम अशा उपक्रमांचाही विद्यार्थ्यांना फायदा होतो. या उपक्रमांतून भारतातील बौद्धिक आणि आध्यात्मिक वैविध्य साजरे केले जाते.